# प्राथमिक पदविका शिक्षण

## (डी. ई एल. इडी)

### अभ्यासक्रम - 509

### गट - 1

**NATIONAL INSTITUTE OF OPEN SCHOOLING**
A – 24/25, Institutional Area, Sector – 62, NOIDA
Gautam Buddha Nagar, UP – 201309
Website : www.nios.ac.in

# *गट* - 1

**गटातील घटक**

**घटक 1 :** सामाजिक विज्ञानाचे स्वरूप

**घटक 2 :** सामाजिक विज्ञान शालेय अभ्यासक्रम

# पाठ्यक्रम


| अ.नं. | घटकांचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | घटक – 1 : सामाजिक विज्ञानाचे स्वरूप | 1 |
| 2. | घटक – 2 : सामाजिक विज्ञान–शालेय अभ्यासक्रम | 19 |

Notes

# घटक 1 : सामजिक विज्ञानाचे स्वरुप

**आराखडा :**

1.0 प्रस्तावना
1.1 अध्यापनाची उद्दिष्टे
1.2 सामाजिक विज्ञान – उद्‌गम व संकल्पना
 1.2.1 सामाजिक विज्ञान उद्‌गम
 1.2.2 सामाजिक विज्ञान आणि त्यांच्या संकल्पनाचा समाजशास्त्राशी संबंध
 1.2.3 उच्च प्राथमिक अभ्यासक्रमातील सामाजिक विज्ञान
1.3 सामाजिक विज्ञान : युग पूर्व
 1.3.1 सामाजिक विज्ञान – आधुनिक जगाचा पूर्णकाल
 1.3.2 सामाजिक विज्ञान आधुनिक आणि सध्याचे जग
 1.3.3 सामाजिक विज्ञानाचे भारतीय स्वरूप
1.4 सध्याची सामाजिक स्थिती
 1.4.1 सध्याची सामाजिक स्थिती आणि आव्हाने
 1.4.2 सामाजिक विज्ञान व्याप्ती सामाजिक वेगळेपण विभिन्नता
1.5 सामाजिक विज्ञानाचे घटक
 1.5.1 सामाजिक विज्ञान कुलातील विषय
 1.5.2 सामाजिक विज्ञान शालेय पातळीवरील सूचना
1.6 सामाजिक शास्त्र व आंतर विद्याशाखांमधील एकात्मता
 1.6.1 आंतर विद्याशाखा आणि एकात्मता
 1.6.2 सामाजिक विज्ञानातील एकात्मतेचे चित्र
1.7 समारोप
1.8 संक्षिप्ते
1.9 आपली प्रगती तपासा
1.10 संदर्भ ग्रंथ सूची
1.11 पाठावरील अभ्यास

## 1.0 प्रस्तावना

सामाजिक विज्ञानाचा अभ्यास म्हणजे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणातील स्त्री–पुरुषांच्या संबंधांतील ज्ञान. सामाजिक विज्ञानाचा उगम हा एक औपचारीक क्षेत्र म्हणून झाला. ज्याचा समावेश उच्च शिक्षण किंवा विद्यापीठीय शिक्षण म्हणून आठराव्या शतकापर्यंत होता परंतु विसाव्या शतकापासून सामाजिक विज्ञानाचा समावेश शालेय स्तरावर करण्यात आला हे सर्व जगभरच झाले. त्यापैकीच भारत हा देश आहे. तुम्ही तुमचा शालेय अभ्यास आठवा, त्यावेळी समाजशास्त्र (Social studies) हा विषय होता. सदर पाठामध्ये आपण सामाजिक विज्ञान, विविध काळातील स्वरूप, उदय आणि सध्या स्थिती, आंतर विद्याशाखीय स्वरूप परस्परातील सहसंबंध इत्यादी गोष्टी या पाठामध्ये विषयाची तात्त्वीक बैठक, टिका, त्यातील उदाहरणे अनुभव आणि प्रकल्प आपण अभ्यासणार आहोत.

(सदर प्रकरणातील चित्रे डॉ. तपनकुमार बसेतीया यांच्या संशोधनातून घेतलेली आहेत.)

## 1.1 अध्ययनाची उद्दिष्टे

**सदर पाठ्य अध्ययनाने पुढील गोष्टी समजतील.**

- सामाजिक विज्ञानाचा उदय
- सामाजिक विज्ञान आणि समाजशास्त्र यांचा सहसंबंध
- उच्च प्राथमिकच्या अभ्यासक्रमातील सामाजिक विज्ञान विषयाचे स्थान
- सामाजिक विज्ञानाचे सध्याचे स्वरूप आणि पूर्वीचे स्वरूप
- भारतीय सामाजिक विज्ञानाचे कालानुरूप चित्र
- सामाजिक विज्ञान विषयाचे स्थान व्याप्ती, सामाजिक चित्र आणि आव्हाने
- सामाजिक विज्ञानाच्या संबंधित विषयांचे स्वरूप समजणे.
- शालेय स्तरावरील सामाजिक विज्ञानाचे घटक समजणे.
- सामाजिक विज्ञानाचे आंतरशाखीय आंतरक्रीया स्पष्ट करणे.

## 1.2 सामाजिक विज्ञान, उदय आणि संकल्पना

सामाजिक विज्ञानाचा अभ्यास म्हणजे मानवी समाज किंवा मानवी सहसंबंधांचे ज्ञान म्हणजेच मानवी जीवनातील वर्तनाचा अभ्यास होय. त्यामध्ये अनेक गाभा घटक आहेत. मानवी जीवनातील सामाजिक वर्तन, आर्थिक वर्तन, राजकीय वर्तन, सांस्कृतिक परंपरा, चालीरिती, सामाजिक संस्था, धार्मिक रुढी, परंपरा, सामाजिक मूल्ये इत्यादी घटक आहेत. सामाजिक विज्ञान हा विषय विद्यापीठ तसेच शालेय स्तरावरही आहे. त्यामध्ये इतिहास राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानव वंश शाखा इत्यादी विषय निवडीला विद्यार्थ्यांना वाव असतो. कनिष्ठ महाविद्यालयात ऐच्छिक विषय आहेत. सामाजिक विज्ञान या विषयाची मूळ संकल्पना या पाठामध्ये समजून घेवू.

### 1.2.1 सामाजिक विज्ञान विषयाचा उगम

औद्योगिकरण, सामाजिक पुनःरुज्जीवन, नागरीकरण, विज्ञानाचा विकास आणि असे अनेक घटक यातून या विषयाचा जन्म झाला आहे. मानवी जीवनात अनेक परिवर्तने आठराव्या शतकापूर्वी आणि नंतर झाले ते बदल पहावयास मिळतात. आठराव्या शतकात एक अमूलाग्र असे वळण घेतले, इटलीतील आणि युरोपिअन देशामध्ये 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांती, 1767 ची औद्योगिक क्रांती, 1776 चे अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध यामुळे भांडवल शाहीचे स्वरूप बदलते, एका बाजूला आनंद सुख व दुसऱ्या बाजूला विविध समस्या निर्माण झाल्या. उदा. अनेक सुखदायी गोष्टी आल्या. व्यापार वाढ झाली. वाहतुक संदेशवहन विकास झाला. आर्थिक स्थितीत वाढ झाली. परंतु त्याची दुसरी बाजू म्हणजे सामाजिक जीवनामध्ये गुंतागुंत निर्माण झाली. राजकीय व सामाजिक अशांतता आली. बौद्धिक संघर्ष सुरू झाला. अनावश्यक स्पर्धा निर्माण झाल्या. या समस्या व आव्हाने आली यातूनच अध्ययनामध्ये सामाजिक शास्त्राचा उदय झाला.

आठराव्या शतकामध्ये सामाजिक विज्ञानाचा उदय झाला. मॉंटेस्कू: स्पिरिट ऑफ लॉ (1748) ॲडमस्मिथ: वेल्थ ऑफ नेशेन (1776), कॉन्डॉरसेट: ऑऊटलाईन ऑफ हिस्टॉरिकल व्ह्यू ऑफ प्रोग्रेस ऑफ दि ह्युमन काईंड (1795) आणि जे, जी, हर्डर : आयडिया टुवर्डस् व फिलॉसॉफी ऑफ हिस्ट्री (1784-91) इ. ग्रंथातून सामाजिक विज्ञानाचे स्वरूप समजते. आधुनिक समाज आणि प्राचीन व्यवस्था यामधून समाजशास्त्रज्ञांना आधुनिक समाजाचे भविष्यकालीन स्वरूप कसे असेल. याबद्दल मार्गदर्शन होईल.

औद्योगिकरण, आधुनिकीकरण, विज्ञानातील प्रगती इत्यादीतून काही नवीन समस्या निर्माण झाल्या. सामाजिक व्यवस्था दुबळी झाली. काही नवीन रोगांची निर्मिती झाली, कामगारांची पिळवणूक सुरू झाली. मानवतेला सुरुंग लागला. काही धोकादायक रसायने अनुशक्ती निर्मिती सुरू झाली. पहिले व दुसरे महायुद्ध, विसाव्या शतकातील दु:ख होय. याशिवाय लहानमोठी युद्धे मानवतेला धक्का देणारी आहेत. विज्ञानाचा दुरुपयोग, नागरीकरण, औद्योगिकरण, यांचा मानवाला धोका आहे. सन 1930-40 दरम्यानची अर्थ व्यवस्थेची घसरण यामुळे असुरक्षितता जाणवू लागली. त्यामुळे जगभरच लोक विचलित झाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासामुळे गेल्या शंभर वर्षांमध्ये नव्याने सामाजिक समस्या निर्माण झाल्या. त्यात काही महत्त्वपूर्ण उत्तम बदलही झाले. यामधूनच सामाजिक विज्ञानाचा जन्म झाला. विज्ञानाचा विकास, औद्योगिकरण, आधुनिकीकरण यांचा वाईट परिणाम थोपविणे हा महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी आधुनिक समाज आणि उत्तम भवितव्य दुसऱ्या बाजूला. तत्त्वज्ञ राजकीय नेते, शास्त्रज्ञ आणि बुद्धीजीवी सुद्धा कबूल करतील की, मूलभूत विज्ञानकर्ते, जीवशास्त्रज्ञ यांच्यापेक्षा साामजिक विज्ञान हे कमी दर्जाचे नाही. एकदा अणुबॉम्ब हा संपूर्ण मानवतेचा विनाश करील. याला थोपविण्यासाठी समाजशास्त्र नक्कीच मदत करेल.

आधुनिक समाजाचा आणि सामाजिक विज्ञानाचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे आजच्या अभ्यासक्रमात सामाजिक विज्ञानाची गरज आहे. अठराव्या शतकापासून जगभरच उच्च शिक्षण तसेच विद्यापीठीय शिक्षणामध्ये या अभ्यासक्रमाचा समावेश केलेला आहे. सामाजिक स्वास्थ्य, लोकशाही नागरिकत्वाची गुणवत्ता विकसित करण्यासाठी विसाव्या शतकात शालेय पातळीवरहीअभ्यासक्रमात समाज शास्त्राचा समावेश केलेला आहे. आज तो सामाजिक विज्ञान म्हणून ओळखला जातो. सदरच्या प्रकरणामध्ये सामाजिक विज्ञान या विषयाचा शालेय पातळीवर व उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये कसा समावेश आहे ते पाहू.

### 1.2.2 सामाजिक विज्ञान आणि समाजशास्त्र यांचा परस्परांशी संबंध

सामाजिक विज्ञान आणि समाजशास्त्र या संकल्पनेमध्ये अनेक बाबतीत फरकही आहे. तो आत्ता आपण पाहणार आहोत.

**सामाजिक विज्ञानाची संकल्पना :**

सामाजिक विज्ञानाचा संबंध हा प्रामुख्याने मानवासंबंधी सामाजिक व सांस्कृतिक बाबींचे ज्ञान होय. सामाजिक विज्ञान विषयाचा संबंध हा प्रामुख्याने माध्यमिक उच्च माध्यमिक वर्गाच्या अभ्यासक्रमामध्ये समावेश आहे. सामाजिक विज्ञान या विषयामध्ये अनेक विषय येतात. इतिहास, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र इ. विविध विषयांचा समावेश होतो. शालेय आणि हायस्कूल व विद्यापीठ शिक्षणामध्ये या विषयांना स्वतंत्र स्थान आहे. खालील व्याख्येतील संकल्पना चार्लस् बेअर्ड (Beard) आणि जेम्स हाय (James High) यांनी मांडली ती पुढील प्रमाणे :

**चार्लस् बेअर्ड :** मानवाच्या संबंधित असणारे ज्ञान विचारसरणी अगदी दगड–काठीपासून आकाशातील तारे आणि प्राकृतिक घटकापर्यंतचा अभ्यास म्हणजे सामाजिक विज्ञान होय. (S. K. Kochar 1984)

**जेम्स हाय :** प्राकृतिक आणि अप्राकृतिक घटकांचे परस्परातील एकाच वेळी घडणाऱ्या घटनांचे संकलन म्हणजे सामाजिक विज्ञान होय.

खालील काही मुद्यांमधून सामाजिक विज्ञानाचे स्वरूप समजेल.

1) **मानवी व्यवसायाचे थेट स्वरूप :** साामजिक विज्ञान विषयामध्ये मानवाच्या व्यवसायाची थेट माहिती विविध क्षेत्रातून उपलब्ध होते.

2) **प्रगत मानवी समाजाचा अभ्यास :** असा अभ्यास वरच्या वर्गांसाठी अभिप्रेत आहे.

3) **मानवी संबंधाचे सत्य शोधणे :** उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमातून याचा उलगडा होऊ शकतो.

Notes

**समाजशास्त्राची संकल्पना :**

समाज शास्त्राचा उदय हा देखील नवा आहे. समाजशास्त्र हा शालेय अभ्यासक्रमाचा भाग आहे. सन 1916 मध्ये समाजशास्त्राचा समावेश अमेरिकने प्रथमता केला. भारतात या विषयाचा प्रारंभ 1937 च्या गांधीजींच्या **मूलभूत शिक्षण** या विषयातून केलेला आसावा.

समाजशास्त्रामध्ये अनेक विषयांची गुंतागुंत आहे. इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांचा समावेश आहे. समाज शास्त्रामध्ये सामाजिक विज्ञानाप्रमाणे स्त्री-पुरुष संबंधाचा समावेश करीत नाही. सक्षम मानवी क्षमतांचा विकास करणे हाच समाजशास्त्र विषयाचा उद्देश आहे. समाजशास्त्राचा संबंध या अनुभवावर आधारित आहे. काही व्याख्या पाहू.

**जेम्स हाय :** सोप्या भाषेत सांगतात समाजशास्त्र हा शाळेचा आरसा असून हुशारीने शोधलेले सामाजिक विज्ञान आहे. समाजशास्त्रज्ञ सांख्यिकी माहिती संकलित करतात आणि सोप्या स्वरूपात त्यातील आंतरक्रिया नुसार विविध वर्गाच्या मुलांसाठी त्यांची मांडणी करतात. (S. K. Kochar 1984)

**जॉन व्ही. मायकेला (John V. Michaela) :** मानव आणि त्याच्या सामाजिक व प्राकृतिक पर्यावरणाच्या संबंधित अभ्यास म्हणजे समाजशास्त्र त्यामध्ये मानवी संबंधाला महत्त्व दिलेले आहे. शिक्षणाच्या गाभ्याशी समाजशास्त्राचा संबंध आहे. : लोकशाही नागरीकत्वाचा विकास (Development of Democratic citizenship) **(S. K. Kochhar)**

**समाजशास्त्राची वैशिष्ट्ये :**

1) समाजशास्त्राचा संबंध हा सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाशी आहे.
2) सामाजिक विज्ञानातून समाजशास्त्र उदयाला आले. शाळातून सामाजिक सुदृढ वातावरणातून लोकशाही मुलांना शिक्षण मिळावे.
3) समाजशास्त्र हे वर्तमान, भूतकाळ व भविष्यकाळाशी नाते जोडते.
4) समाजशास्त्रात गतकाळापेक्षा सध्याच्या मानवी जीवन व त्यांच्या समस्या यावर अधिक भर आहे.
5) समाजशास्त्रामध्ये कुटुंब, समुदाय, देश, राज्य यांचा विशाल मानवतेच्या दृष्टीने विचार करण्याची कल्पना असून समाज व संस्कृती याच्याशी मेळ घातला जावा.
6) समाजाचे प्रत्यक्षातील स्वरूप हे समाजशास्त्रातील वास्तव आहे.
7) समाजशास्त्र हा विकसित होत असणारा सध्याचा विषय आहे. त्याचे स्वरूप विस्तृत निर्माण करण्याचे ध्येय आहे.
8) समाजामध्ये जगत असताना शालेय अभ्यासक्रमात हा विषय हे केंद्रस्थानी असावा. उत्तम समाज जीवनाचा विकास होण्यास मदत होईल.

**सामाजिक विज्ञान व समाजशास्त्र यांच्यातील कार्यात्मक साम्य व भेद :**

सामाजिक विज्ञान व समाजशास्त्र या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांच्यामध्ये अनेक बाबतीत साम्य असले तरी विविध बाबतीत वेगळेपणही आहे. दोन्हीतील साम्य व भेद पाहू.

**साम्य :**

1) सामाजिक विज्ञान व समाजशास्त्र एकाच घटकातून निर्माण झालेले आहेत.
2) दोन्हीच्या अभ्यासक्रमात सामाजिक आशय आहे.
3) दोन्हीमध्ये स्त्री-पुरुष नाते, तसेच त्याच्याशी संबंधित पर्यावरण हे केंद्रस्थानी आहे.
4) सामाजिक विज्ञान व समाजशास्त्र यांच्यामध्ये मानवी संबंधाचा समान धागा आहे.
5) स्त्री-पुरुष करीत असलेली विविध कामे मूलभूत गरजा भागविण्यासाठी असून जीवनाच्या गरजा भागविणे उपभोग घेणे आणि मानवी संपदा नैसर्गिक संपदाची बचत करणे हा उद्देश आहे.

Notes

आकृती 1.1 सामाजिक विज्ञान आणि समाजशास्त्र यातील संबंध




**आकृती 1.1**

**संदर्भ :** John Jarolimek - “Social studies in Elementary education,” – 1959 New York

**फरक :**

| **फरकाच्या गोष्टी** | **सामाजिक विज्ञान** | **समाजशास्त्र** |
|---|---|---|
| व्याप्ती | सामाजिक विज्ञान हे समाजशास्त्राच्या पितृस्थानी आहे. | समाजशास्त्राची निर्मिती सामाजिक विज्ञानातून झाली. |
| अभ्यास क्षेत्र | मानवासंबंधी तात्विक बैठक आहे. | मानवाचा अनुभवाआधारे गोष्टींचा संबंध आहे. |
| अभ्यास क्षेत्र | सामाजिक विज्ञान सामाजिक एकता शोधते | सामाजशास्त्र हे उपयोगितेचे साधन आहे. |
| अभ्यास पद्धती | सामाजिक विज्ञान तारुण्याचे प्रतिक आहे. | समाजशास्त्र हे बालबोधाचे प्रतिक आहे. |
| उद्देश | सामाजिक विज्ञान ज्ञानाशी संबंधित असून ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. | समाजशास्त्र सामाजिक समस्यावर उपचार शोधते. |
| घटक | सामाजिक विज्ञानामध्ये अनेक विषय येतात. उदा. इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र इ. | समाजशास्त्रात विविध विषयांचा समावेश असून त्यांना तीन-चार विषयांना एकत्र आणलेले आहे. (उदा. इतिहास, अर्थशास्त्र हा विषय उच्चमाध्यमिक मध्ये शिकविला जातो. |
| विषयाचे स्वरूप | सामाजिक विज्ञानामध्ये अनेक विषय असून प्रत्येक विषयाची स्वततंत्र ओळख आहे. | समाज शास्त्रात अनेक विषयांची सरमिसळ असून त्यात नव्या विषयांचा उदय होतो. त्यामुळे त्यातील वेगळेपण बाजूला करता येत नाही. |
| वाचक | सामाजिक विज्ञानाचे वाचक अल्पसंख्य असून आवड असणारे फक्त त्याचे वाचन करतात. | समाजशास्त्राचा मुख्य हेतू हा नागरिकत्वाची तयारी करणे त्यामुळे सर्वांनाच त्या विषयाचा अभ्यास करावा लागतो. |
| अभ्यास स्तर | मानवी समाजाचा प्रगत अभ्यास आहे. हा विषय माध्यमिक किंवा महाविद्यालयात अध्यापन केला | समाजशास्त्र हे सामाजिक विज्ञानातील सोपे स्वरूप आहे. त्यामुळे शाळा आणि उच्च प्राथमिक स्तरावर शिकविला जातो. |

| | | |
|---|---|---|
| | जातो. | |
| व्याप्ती | प्रत्येक सामाजिक विज्ञानातील विषयाच्या मर्यादा आहेत. उदा. अर्थ शास्त्राचा संबंध आर्थिक क्षेत्राशी येतो. | समाजशास्त्राचा मानवी जीवनाशी संबंधित असणाऱ्या विविध घटकांशी येतो. |
| व्याप्ती | सामाजिक विज्ञानाची व्याप्ती मोठी असल्याने विविध विषयांचा समावेश होतो. | समाजशास्त्र हा विषय सामाजिक विज्ञानाचा भाग आहे. त्यामुळे त्याची व्याप्ती मर्यादित आहे. |
| बहुविधता | सामाजिक विज्ञानामध्ये सामाजिक बहुविधतेचे स्वरूप आहे. | समाजशास्त्र हा विषय फक्त शाळा आणि उच्च माध्यमिकपर्यंत अध्यापनाचे सरळ स्वरूप आहे. |

### 1.2.3 उच्च प्राथमिकच्या अभ्यासक्रमातील सामाजिक विज्ञान

जगातील बहुसंख्या देशात शालेय अभ्यासक्रमामध्ये सामाजिक विज्ञान हा विषय समाविष्ट केलेला आहे. भारतामधील या विषयाची स्थिती पाहू. इ. 1 ली ते 5 वी पर्यंत हा विषय पर्यावरणशास्त्रामध्ये समावेश केलेला आहे व 5 वी ते 8 वी पर्यंत आणि 9 वी 10 वी साठी संयुक्त गाभा विषय म्हणून समावेश आहे. त्याला समाजशास्त्र किंवा सामाजिक विज्ञान म्हणून ओळखले जाते. उच्च प्राथमिकच्या वर्गांना इतिहास, भूगोल यांचा संयुक्त अभ्यास आहे. उच्च माध्यमिक वर्गात XI – XII विषयांची व्याप्ती वाढते त्यामध्ये राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र मानसशास्त्र इत्यादी विषय ऐच्छिक व विशेष विषय म्हणून निवडले जातात.

उच्च प्राथमिकच्या सामाजिक विज्ञान अथवा समाजशास्त्र ही विषयाची नावे अनेक वेळा एकमेकांच्या नावासाठी वापली जातात. NCF (2005 पान क्र. 53) समाजशास्त्र म्हणून उल्लेख आहे. **(Position Paper – Nation Focus Group on Teaching Social Sciences 2006 p-5)** उच्च प्राथमिकच्या अभ्यासक्रमामध्ये सामाजिक विज्ञान अशा विषयामध्ये इतिहास – भूगोल – राजकीय व सामाजिक जीवन या CBSE या पुस्तकाचे Title आहे. सदर पुस्तके NCERT ने प्रसिद्ध केलेली आहेत. प्राथमिकच्या अभ्यासक्रमात सामाजिक विज्ञान किंवा समाजशास्त्र असा उल्लेख केलेला असला तरी उच्च शिक्षणामध्ये मात्र सामाजिक विज्ञान असाच नामोलेख अभिप्रेत आहे.

उच्च प्राथमिक अभ्यासक्रमातील सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे –

1. विद्यार्थ्यांना औद्योगिक, समाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाची समज यावी.
2. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक क्षमता व जबाबदाऱ्या विकसित व्हाव्यात.
3. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही नागरिकत्वाच्या गुणांमध्ये विकास व्हावा.
4. देशभक्ती, राष्ट्रीय समज, आंतरराष्ट्रीय सामंजस्यांचा विकास व्हावा.
5. विद्यार्थ्यांनी सामाजिक आर्थिक संस्थांमध्ये सहभागी व्हावे व मदत करावी.
6. सध्याच्या व भविष्यकाळातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी व्हावी.
7. नैतिक, भावनिक विकास व स्वाभिमान याबाब विद्यार्थ्यांमध्ये विकास व्हावा.

**उच्च प्राथमिकच्या सामाजिक विज्ञान अध्यापन (2006) दृष्टीकोन**

उच्च प्राथमिक स्तरावरील सामाजिक विज्ञान विषयाची उद्दिष्टे :

- मानव व मानवेतर सजीव सृष्टी आणि पृथ्वीच्याबाबतची कल्पना विकसित करणे.
- आपला प्रदेश, राज्य, देश इत्यादींचा अभ्यास पृथ्वीच्या सदर्भाने करण्यास प्रोत्साहन देणे.
- भारताचा पूर्वइतिहास आणि जगातील विकासाच्या संदर्भाने अभ्यास करणे.
- देशपातळीवर सामाजिक, राजकीय संस्थाच्या कार्यपद्धतीवर अभ्यास प्रारंभ करणे.

सामाजिक विज्ञानाच्या स्तरावर इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयांचा एकत्रित अभ्यास करणे. विविध समस्या, गरीबी, निरक्षरता, बालकामगार वर्ग, जात, लिंग आणि पर्यावरण इत्यादी. भूगोल आणि अर्थशास्त्र यांचा विकासाशी संबंध असल्याने त्याचा एकत्रित अभ्यास करणे. इतिहासाचा अभ्यास बहुविधतेने केला जातो. मुलांना स्थानिक व राज्य, तसेच देशाचे सरकारबद्दलची माहिती तसेच लोकशाहीचा त्यामधील सहभाग याविषयाची माहिती तसेच लोकशाहीचा त्यामधील सहभाग याविषयाची माहिती देण्याचा उद्देश आहे.

**आपली प्रगती तपासा – 1**

**टीप :** खालील प्रश्नाचे उत्तर लिहा आणि पाठाच्या शेवटच्या उत्तराशी तुलना करा.

**प्रश्न :** उच्च प्राथमिक स्तरावरील सामाजिक विज्ञान या विषयाबाबत National Focus Group on Teaching Social Sciences (2006)? यानुसार कोणती उद्दिष्ट्ये आहेत?

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

## 1.3 सामाजिक विज्ञान : युगपूर्व

प्रत्यक्षात सामाजिक विज्ञान अध्ययन हा काही नवीन बाब नाही. सामाजिक विज्ञान अध्ययन हे शैक्षणिक पद्धतीमध्ये अगदी मानवाच्या संस्कृतीमधील पहिल्या दिवसापासून आहे. सामाजिक विज्ञानाचा कसा प्रवास झाला ते पाहू.

### 1.3.1 सामाजिक विज्ञान – आधुनिक जगाचा पूर्व काल

आधुनिक जगाचा पूर्व काळ हा सतराव्या–अठराव्या शतकापासून मानवी समाज निर्मिती काळापर्यंत समजला जातो. तर आधुनिक जगाचा काळ आठराच्या एकोणीसव्या शतकापासून समजला जातो. आधुनिक पूर्व काळ शिकार, फळे कंदमुळे जमा करणे, भटके पशुपालन, पाषाण युगु, नद्यांखोऱ्यातील संस्कृती आणि आठराव्या एकोणीसाव्या शतकातकातील संस्कृती ही मध्ययुगीन संस्कृती समजली जाते, लोकांना कुटुंब समाज रचना करण्याची गरज भासली त्यामुळे सामाजिक विज्ञान शिकण्याची गरज भासली, त्या काळात हा अभ्यास अनौपचारीक स्वरूपात विसंघटित होता. समाज जास्त गुंतागुंतीचा झाला तेव्हा या विषयाची गरज भासली.

प्राचीन व मध्ययुगीन जगात आजच्याप्रमाणे संदर्भ नव्हते. प्लेटो, अरिस्ट्रॉटलसारख्यांचे यात योगदान आहे. प्लेटोचे Repulic अरिस्ट्रॉटलचे Politics याचे ग्रंथ आजही नागरीकत्वाची शपत घेण्यासाठी औपचारिक म्हणून (Civic oath of the Greeks) वापरतात. आपण अप्रमाणिक व भ्याड लोकांना पाठीशी घालणार नाही. शहराचे पावित्र्य राखण्यासाठी झगडू. स्वत: आणि इतरांनाही सहभागी करू. शहराचे नियम पाळू त्यासाठी अनेकांचा सहभाग घेवू. शहर जे आहे त्यापेक्षाही अधिक सुंदर करण्याचा प्रयत्न करू. मध्ययुगीन व पूर्व आधुनिक काळातील सामाजिक मूल्ये, धार्मिक अभ्यास, आर्थिक आणि व्यावसायिक अध्ययन, राजकीय अभ्यास हा शैक्षणिक अभ्यासाचाच भाग आहे.

### 1.3.2 सामाजिक विज्ञान आणि आधुनिक व समकालीन जग

सदरच्या भागामध्ये आधुनिक युगातील समाजशास्त्राचा उदय या भागावर चर्चा आहे. सामाजिक विज्ञानाचा औपचारिक विषय पद्धतशीरपणे अभ्यास करण्याची वेळ आहे. दिवसेंदिवस

Notes

सामाजिक विज्ञानाच्या नवीन–नवीन अभ्यास शाखा सुरू होत असून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी त्यांची गरज आहे. सदरच्या प्रकरणामध्ये सामाजिक विज्ञान हा विषय उच्च शिक्षण, विद्यापीठामधे 18 व्या शतकापासून अभ्यासक्रमात आहे. तो सध्या विसाव्या शतकात शालेय स्तरावर आलेला आहे. दोन्हीही महायुद्धानंतर जगभरच सामाजिक विज्ञानाची शालेय अभ्यासक्रमात गरज वाटली असावी. युद्धोत्तर काळात युनेस्को–युनिसेफ (UNESCO – UNICEF) या सारख्या संस्था स्थापन झाल्या. त्याचा शिक्षणाशी संबंध आहे. सामाजिक सुदृढता वाढावी यासाठी सामाजिक विज्ञानाची गरज आहे. सन 1948 मध्ये मानवी हक्काची स्विकृती केली. सर्व मानवाला मुक्तपणे समान दर्जा आणि हक्क मिळाला पाहिजे हे युनोने स्विकारले. बंधुत्वाकडे वाटचाल करण्याचे धोरण स्विकारले. Cammission 1996 ने एकत्रित जगण्याचे शिक्षण (learning to live together) यावर भर दिला. आधुनिक जगामध्ये औपचारिक विज्ञानाची गरज आहे. जगभरच्या अभ्यासक्रमात शालेय व विद्यापीठीय शिक्षणामध्ये सामाजिक विज्ञान हा विषय उत्तम नागरिक घडवू शकतो असे दिसून येते.

## 1.3.3 सामाजिक विज्ञान काळानुरूप भारतीय स्थिती

भारतीय शिक्षण पद्धतीत सामाजिक विज्ञान अभ्यासातील भाग आहे. नैतिकता आध्यात्मिकता, सामाजिक मूल्ये आणि कल इत्यादीमधून जीवनाचे तत्व फार प्राचीन काळापासून समाजाला दिले जात आहे. वेद, उपनिषद, स्मृती, पुराणे, रामायण, महाभारत इत्यादीमधून समाजातील काही मूल्ये, जीवनाची तत्वे मिळालेली आहेत. कौटिल्याचे अर्थशास्त्र, विष्णूशर्माचं पंचतंत्र इत्यादी साहित्यातून समाजाचे सामाजिक शास्त्रच होते. मध्यपूर्वकालीन आणि मध्ययुगातील साहित्य उदा. बुद्धाच्या उक्ती, जैन साहित्य, इस्लाम ग्रंथ, भक्ती संप्रदायाचे साहित्य हे सामाजिक सांस्कृतिक मूल्ये आणि वारसा आहे. हे साहित्य म्हणजे सामाजिक विज्ञानच आहे. भारतीय शिक्षण आणि संस्कृती ही प्राचीन व मध्ययुगीन संस्कृती हा सामाजिक शाखाचा भारतीय शिक्षणाचा भाग झाला. तो उच्च शिक्षणामध्ये आठराव्या एकोणिसाव्या शतकामध्ये औपचारिक शिक्षण म्हणून समावेश केला. गांधीजींची मूलभूत शिक्षण प्रणालीचे पासून अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. शालेय अभ्यासक्रमात सामाजिक विज्ञान म्हणून शैक्षणिक धोरणामध्ये कसा बदल झाला ते पाहू.

**माध्यमिक शिक्षण आयोग (सन 1952–53) च्या शिफारशी :**

समाजशास्त्र ही संज्ञा नव्या भारतीय शिक्षणपद्धतीत नवीन होती. म्हणजे पारंपारिक पद्धतीमध्ये इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, नागरिकशास्त्र इ. विद्यार्थ्यांना सामाजिक जीवनाशी संबंधित असा भाग होता. त्यामध्ये कुटुंब, समुदाय, राज्य, देश इत्यादी. समाजाचे सध्याच्या समाजामध्ये कसे परिवर्तन झाले. सामाजिक दबाव, चळवळी मध्ययुगामध्ये होत होत्या. त्याचा परिणाम पाहून त्याचे स्पष्टीकरण करणे हा समाजशास्त्रातील अभ्यास विषय होता.

**शिक्षण आयोग (1964–66) च्या शिफारशी :**

समाजशास्त्र अध्यापनामध्ये पर्यावरणाचे ज्ञान व्हावे, मानवी संबंधांचे ज्ञान व्हावे, दृष्टीकोन आणि मूल्ये यांचा समाजाशी, राज्याशी, देशाशी आणि जगाशी बौद्धिक सहभाग वाढावा हा हेतू आहे. देशात उत्तम नागरिक आणि भावनिक एकात्मता विकसित व्हावी हा समाजशास्त्राचा परिणामकारक कार्यक्रम आहे.

**NCERT (1975) दशवार्षिक अभ्यासक्रम आराखडा**

इयत्ता I आणि II च्या वर्गासाठी नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणामध्ये पर्यावरण विषय समाविष्ट केलेला आहे. या वर्गांना समाजशास्त्रा हा विषय प्राथमिक स्तरावर सुयोग्य आहे.

**राष्ट्रीय अभ्यासक्रम (1988) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण**

**निरीक्षणे :**

राष्ट्रीय प्राथमिक शिक्षण (1986) नुसार सामाजिक विज्ञान हा कदाचित एकमेव विषय हा सर्व गाभा घटकांना घेवून परिणामकारक साधन उपयोगी पडावा. NPE नुसार गाभा घटक पुढीलप्रमाणे

i. भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास

ii. घटनात्मक बंधने

iii. भारतीय संस्कृती व वारसा यांची मूल्ये

iv. लोकशाही व धर्मनिरपेक्षता समानता

v. स्त्री–पुरुष समानता

vi. पर्यावरण रक्षण

vii. छोट्या कुटुंबाचा पुरस्कार

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2005 P-50) टिपणी :**

सामाजिक विज्ञान विविधतेने व्यापले आहे. त्यामध्ये इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादी विषयांचा समावेश आहे. सामाजिक विज्ञान हा विषय सामाजिक शांततेचा पाया आहे. सभोवतालच्या समाजाचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची विद्यार्थ्यांमध्ये जाणीव व्हावी असा उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीगत जीवनातील अनुभूतीच्या आधारावर अभ्यासक्रम असावा. असा उद्देश असावा. अर्थपूर्ण अभ्यासक्रम असावा. तसेच साहित्यची निवड करताना सूक्ष्म पद्धतीने समाजाचे निरीक्षण करावे. त्यांच्या समोर त्यामुळे आव्हान निर्माण होईल.

**आपली प्रगती तपासा – 2**

**प्रश्न :** प्राचीन भारतीय संस्कृती व शिक्षण पद्धतीमधील सामाजिक विज्ञान विषयाचे स्थान स्पष्ट करा.

**टीप :** सोबतच्या जागेत तुमचे उत्तर लिहा आणि पाठाच्या शेवटी दिलेल्या उत्तराशी पडताळा करा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

## 1.4 समाजाची सध्या स्थिती

पूर्वीच्या समाजातूनच आजचा समाज निर्माण झालेला आहे. लोक त्याला आधुनिक समाज किंवा आधुनिक पूर्व समाज म्हणतात. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिकपूर्व समाजाची फार थोडी वैशिष्ट्ये आजच्या समाजात आढळतात. सध्याच्या समाजाचे चित्र, आव्हाने आणि सामाजिक विज्ञानाची भूमिका या भागामध्ये पाहू.

### 1.4.1 सध्याची सामाजिक स्थिती आणि आव्हाने

एकविसाव्या शतकातील समाज म्हणजे सध्याचा समाज यामध्ये अनेक वैशिष्ट्ये आहेत. विकास, बदल, द्विधा, प्रश्न, आव्हाने या समाजामध्ये आहेत. काही मुद्दे –

1. विज्ञान व तंत्रज्ञानामुळे सामाजिक गती वाढली आहे.
2. गुंतागुंत, एकसंघ नसलेला, विविधता आणि विविध बाबतीत फरक असलेला समाज सध्या स्थितीत आहे. उदा. आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक इ.

Notes

3. नवीन समाजामध्ये आधुनिकता, औद्योगिकता, नागरिकरण, विशेषीकरण, यांत्रिकीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण, स्वायत्तता, नियोजित विकास इ. मूलभूत वैशिष्ट्ये आहेत.
4. नव्या मूल्याचे लोकशाही, साम्यवाद, सर्वधर्मसमभाव, स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, न्याय, वैज्ञानिक दृष्टी, व्यक्तिगत हक्क, स्वातंत्र्य हे समाजाचे फलित आहे.
5. मोठ्या प्रमाणत समाजाची गतीशीलता, सांस्कृतिक बहुविधता, बहुभाषिकता, परंपरेचा ऱ्हास, हे आधुनिक समाजात दिसून येते.
6. सध्याच्या समाजात विविध सामाजिक समस्या आणि आव्हाने दिसनू येतात. उदा. गरीबी, बेकारी, भांडवलशाहीच्या पायावर शोषण, शहरी व ग्रामीण भागातील दरी, झोपडपट्ट्यात वाढ, सामाजिक संघर्ष, लोकसंख्या समस्या, कौटुंबिक विसंवाद, सामाजिक गुन्हेगारी, भ्रष्टाचार, सामाजिक असंतोष, प्रादेशिकवाद, अविकसितपण, पर्यावरण हल्ला, इत्यादी प्रश्नांशी माहिती व ज्ञानाचा विस्फोट यांच्यात एकरूपता न झाल्याने समस्या निर्माण झालेल्या आहेत.

### 1.4.2 सामाजिक विज्ञानाची व्याप्ती-सामाजिक विभिन्नता

सामाजिक विभिन्नतेच्या व विविधतेच्या व गुंतागुंतीच्या समाजात अनेक समस्या व आव्हानांना समोरे जावे लागते. काही समस्यांचा उल्लेख वर (1.4.1) मध्ये केलेला आहे. सामाजिक समस्यांना सध्याच्या समाजाला सामोरे जावे लागण्याचे कारण म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास, वाढती माहिती प्रसारणे आणि अनेक कारणांनी नव्या-नव्या समस्या उदयास येत आहेत. नव्या सामाजिक विज्ञानाच्या अभ्यासकांना या नव्या सामाजिक समस्यांनी नोंद घ्यावी लागते. आठराव्या एकोणिसाव्या शतकामध्ये सामाजिक विज्ञानाच्या विषयामध्ये समाजसेवा, लोकप्रशासन, गुन्हेगारी, मानसशास्त्र, लोकसंख्याशास्त्र इत्यादी अभ्यास विषय होते. परंतु गेल्या शतकात किंवा सध्याच्या शतकात त्या विषयांना सर्वसाधारण महत्त्व आले कारण नव्या समस्या उदयाला आल्या. आठराव्या, एकोणिसाव्या शतकात लोकसंख्या वाढ ही मोठी समस्या नव्हती पण गेल्या आणि आत्ताच्या शतकात लोकसंख्या हा सामाजिक विज्ञान मधील महत्त्वाचा विषय असून लोकसंख्येमुळेच सामाजिक जीवनावर परिणाम होत आहे. त्यामुळे लोकसंख्या शास्त्र हा शिक्षणप्रकीयेतील महत्त्वाचा विषय बनला आहे. आधुनिकपूर्व काळात मानवी जीवन साधे होते. गुन्हेगारी कमी होती. पण आजच्या औद्योगिक समाजात सगळीकडेच मानवी जीवनात अनुभवास येत आहे. त्यामुळे आजच्या शिक्षण पद्धतीत गुन्हेगारी हा अभ्यास विषय बनला आहे. अशा अनेक समस्या उदयास येत असल्याने सामाजिक विज्ञान विषयाच्या व्याप्तीत वाढ झाली आहे.

**आपली प्रगती तपासा - 3**

**टीप :** आपले उत्तर पाठाच्या शेवटी दिलेल्या उत्तराशी पडताळणी करा.

**प्रश्न :** नव्या सामाजिक विज्ञानाचा उदय का होत आहे?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

## 1.5 सामाजिक विज्ञानाचे घटक

मूळात सामाजिक विज्ञान हा क्षेत्र अभ्यास आहे. या विषयाचा उदय अगदी अलिकडचा असला तरी इतर विषयाच्या अभ्यासाशी निगडीत आहे. समाज जीवनाशी संबंधीत असल्याने

काळाबोबर आव्हाने वाढत आहेत. सामाजिक विज्ञानाचे स्वरुप शालेय स्तरावर क्षेत्र अभ्यासविषय म्हणून कसे आहे ते पाहू –

Notes

## 1.5.1 सामाजिक विज्ञान कुळातील विषय

ज्ञान हे एकसंघ असते त्याचे तुकडे पाडून विभाजन करता येत नाही. ज्ञानाचे मोठेमोठे भाग पाडून परस्परांशी असलेले ज्ञानाचे वर्गीकरण केलेले असते. सोबतच्या चौकटीमध्ये असलेली माहिती पहा.

**ज्ञान संपादनाचा विशाल क्षेत्रे**

| **अभ्यासक्षेत्र** | |
|---|---|
| प्राकृतिक विज्ञान | पदार्थ विज्ञान<br>रसायनशास्त्र<br>भूशास्त्र |
| गणितीय विज्ञान | बीजगणित<br>अंकगणित<br>भूमिती |
| जीवशास्त्र | वनस्पती शास्त्र<br>प्राणिशास्त्र<br>जीव तंत्र शास्त्र<br>सूक्ष्मजीवशास्त्र |
| सामाजिक विज्ञान | इतिहास<br>अर्थशास्त्र<br>राज्यशास्त्र<br>मानसशास्त्र |
| भाषा शास्त्र | साहित्य<br>भाषाशास्त्र<br>नाटक व कादंबरी |

एक ज्ञान शाखा म्हणून काही निकष असतात. पुढील तीन निकष कोणते ते पहा.

1) प्रत्येकाची स्वतंत्र विषयांची संख्या

2) प्रत्येक विषयाचे परस्परातील कार्यात्मक संबंध आणि वेगळेपण

3) कार्यात्मक संबंध आणि प्रत्येकाचे भिन्न भिन्न विषय असतात. क्षेत्र भिन्नता असते.

सामाजिक विषय म्हणून स्वतंत्र ज्ञानशाखा वरील वेगळेपणाच्या तीन अटी व निकष पूर्ण करते. (1) सामाजिक विज्ञान विषयामध्ये इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयाचा समावेश आहे. (2) प्रत्येक विषयाचा कार्यात्मक संबंध आहे तसाच त्यांच्यामध्ये सामाजिक विज्ञान म्हणूनही वेगळेपण आहे. मानवी संबंध हा समान घटकही आहे. उदा. अर्थशास्त्र आर्थिक बाबींशी संबंधित आहे. राज्यशास्त्राचा संबंध प्रशासनाशी तसेच कायद्याशी संबंधित आहे. (3) सामाजिक विज्ञानामध्ये अभ्यासले जाणाऱ्या विषयांचा कार्यांत्मक संबंध आणि इतर विषयांशी संबंध आहे.

Notes

उदाहरण देता येईल की सर्व विषय ज्ञानशाखा आहेत त्यांची प्राथमिक व मूलभूत संकल्पना आहे सामाजिक विज्ञान किंवा समाजिक विज्ञान क्षेत्राने काही सामाजिक गुणधर्म धारण केलेले आहेत त्याची सविस्तर माहिती नंतर पाहू. सामाजिक विज्ञान सामाजिक संबंधांशी आहे. भौतिक विज्ञानामध्ये, करंट, लाईट, रसायन इत्यादी, जीवशास्त्रामध्ये प्राणी वनस्पतींचा अभ्यास, गणितीय विज्ञानामध्ये अंकांचा संबंध येतो.

सामाजिक विज्ञानामध्ये समाजाच्या संबंधित अनेक विषय येतात. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान हे जुने विषय आहेत परंतु मानवी हक्क, लोक प्रशासन, समाजसेवा इत्यादी विषय तारुण्यावस्थेत आहेत. सामाजिक विज्ञानाचे तीन गटात वर्गीकरण करता येईल.

1) निर्भेळ सामाजिक विज्ञान : राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, कायदा शास्त्र समाजशास्त्र, मानवशास्त्र, लोकशासन, सामाजिक सेवा, मानवी हक्क इत्यादी.

2) दुय्यम सामाजिक विज्ञान, नीतीशास्त्र शिक्षण, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, कला इत्यादी

3) समाजसंबंधी शास्त्रे : भूगोल, जीवशास्त्र, वैद्यकशास्त्र, भाषाशास्त्र, ग्रंथालयशास्त्र इत्यादी.

## 1.5.2 सामाजिक विज्ञान शालेय पातळीवरील सूचना

सामाजिक विज्ञान या भागात सामाजिक विज्ञानातील विविध विषयांचा समावेश आहे. त्यामध्ये इतिहास भूगोल याही विषयांचा समावेश आहे. सध्याचा अभ्यासक्रम CBSE चा अभ्यासक्रम NCERT ने तयार केलेला असून त्यात तीन भाग आहेत (इतिहास भूगोल राज्यशास्त्र) याची पुढील भागात सविस्तर माहिती मिळेल. उच्च प्राथमिकच्या अभ्यासक्रमात चौथ्या विषयाचा समावेश आहे. (इतिहास भूगोल, राज्यशास्त्र अधिक अर्थशास्त्र) आणि उच्च प्राथमिकच्या अभ्यासक्रमात इतिहास राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र यांचा समावेश आहे. विषयाची रचना सोबतच्या आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे.




**आकृती 1.2 : सामाजिक विज्ञान उच्चप्राथमिक / माध्यमिक स्तर**

Notes

**आपली प्रगती तपासा – 4**

**प्रश्न :** सामाजिक विज्ञान विषयाच्या क्षेत्राच्या तीन निकष कोणते? सामाजिक विज्ञान या विषयात समावेश असलेल्या पाच विषयाची नावे लिहा.

**टीप :** (आपले उत्तर पाठाच्या शेवटी दिलेल्या उत्तराशी पडताळणी करा.)

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

## 1.6 सामाजिक विज्ञान : आंतरविद्याशाखांमधील एकात्मता

कोणतीही ज्ञानशाखा ही पूर्णपणे स्वतंत्र असू शकत नाही. मागील भागात पाहिलेले आहेच की प्रत्येक विषयाचा परस्परांशी कार्यात्मक संबंध असतो. सामाजिक विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये विविध विषयांशी कार्यात्मक संबंध आहे. तसाच सामाजिक विज्ञानाच्या विषयांमध्येही परस्परांशी संबंध आहे तो कसा आहे ते पाहू.

### 1.6.1 आंतरविद्याशाखा आणि एकात्मता

सामाजिकशास्त्राचे स्वरूप आंतरविद्याशाखीय आहे. त्यातील विषयांचे स्वरूपही परस्परांशी संबंधित आहे. त्यामध्ये मूलभूत प्राकृतिक विज्ञान, भाषाअध्ययन, जीवशास्त्र इत्यादी विषयही परस्परांशी संबंधित आहेत. उदा. इतिहास हा विषय तो आंतरशाखीय स्वरूपाचा आहे. इतिहास अभ्यास करताना समाजशास्त्राचा इतर अभ्यास केला जातो. धार्मिक इतिहास, सामाजिक विज्ञानाचा थेट संबंध नसणाऱ्या पदार्थ विज्ञान, वनस्पतीशास्त्र इतिहास, प्राणी शास्त्र इतिहास, गणिताचा इतिहास, भाषिक इतिहास हे सर्व इतिहासाशी संबंधित आहे. समाजशास्त्राचा इतिहास माहीत असल्याशिवाय सामाजिक विज्ञानाचा अभ्यास पूर्ण होत नाही.




**आकृती 1.3 : सामाजिक विज्ञान न्यायशास्त्राचा इतर विषयाशी संबंध**

### 1.6.2 सामाजिक विज्ञानातील एकात्मिक चित्र

ज्ञानशाखांमध्ये भिंती घालणे शक्य नसते. ज्ञानाचे एकमेकांमध्ये संक्रमण होते. सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये सहजपणे होणे अपेक्षित आहे. सामाजिक विज्ञानामध्ये ते आंतरशाखीय कसे आहे ते पाहू. शालेय स्तरावर अन्न, वस्त्र, निवारा, वाहतुक संदेशवहन हे सामाजिक विज्ञानातील परस्पर संबंधित घटक आहेत. उदाहरण घ्यायचे झाले तर, अन्न या घटकाचा विविध

क्षेत्राशी संबंध येतो. उत्पादन, बाजारपेठ, उपभोग इत्यादी त्याचा संबंध अर्थशास्त्रीय येतो. अन्न पद्धती, परंपरा, कुटुंबातील गैरसमज इ. गोष्टी अन्नासंबंधी असतात. वितरणातील समानता, अंदाजपत्रक, बाजारभावातील चढउतार इ. बाबी राज्यशास्त्राशी संबंधित आहेत. काळानुरूप अन्न, विविध काळातील अन्न उपलब्धता, इतिहासाशी संबंधित आहेत. विविध स्वादाचे खाद्य, आरोग्य संभाळण्याच्या सवयी हा विषय गृहविज्ञानाशी संबंधित आहे. अन्नाचे प्रमाण, गणिताशी संबंधित आहे. अन्नातील पोषक घटक जीवशास्त्राशी संबंधित तर स्वच्छता, चौरस आहार हा अरोग्याशी संबंधित आहे. अन्नप्रक्रिया, त्याला शिजविण्यासाठी लागणारी ऊर्जा, मायक्रोवेव्ह फ्रीजिंग इ. विषय पदार्थविज्ञानाशी आणि अन्न टिकविण्यासाठी लागणशरी रसायने हा रसायनशास्त्राशी संबंधित असणारा विषय आहे, एखादे धान्य पिकविण्यासाठी आवश्यक ती मृदा, पर्यावरण भौगोलिक घटकाचा भाग आहे. शब्दसंग्रह, वर्णन, कविता हा भाषा आणि साहित्याचा भाग आहे. अशा प्रकारे अन्न ही सामाजिक विज्ञानातील संकल्पना ही विविध विषयांशी कशी संबंधित आहे हे लक्षात आले असेल. आता आपण सामाजिक विज्ञान ही आंतरशाखीय ज्ञान आहे हे कार्याच्या संदर्भाने पाहू.

**कार्य : सामाजिक विज्ञान आंतरविद्याशाखीय ज्ञान :**

सदरचे वर्गातील कार्य असून सामाजिक विज्ञानाचा उच्च प्राथमिक अभ्यासक्रमातील भाग आहे. इयत्ता VI मधील भूगोल विषयातील वने या प्रकरणावरील भाग घेवू. त्यावरील कार्य पुढीलप्रमाणे.

**A : कार्याचे स्वरूप :**

| | | |
|---|---|---|
| इयत्ता | : | VI |
| अध्ययनविषय | : | सामाजिक विज्ञान |
| अध्ययन संकल्पना | : | वने |
| अध्ययन उद्दिष्ट | : | वनांसंदर्भात आंतरशाखीय ज्ञान |
| साहित्य | : | पोस्टर्स |
| अध्ययन पद्धती | : | पोस्टर्स दाखविणे |
| अध्ययन स्वरूप | : | व्यक्तिगत |

**कार्यपद्धती :**

वने ही संकल्पना समजण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना त्यासंबधी माहिती देवून प्रोत्साहन देतात.

मित्रांनो सोबत काही पोस्टर आहे. पहिला भाग हा कदाचित नियमाच्या (कायदा) संदर्भात आहे तर दुसरा भाग जीवशास्त्राशी संबंधित आहे. पहिला भाग हा कायद्यासंबंधित का आहे तर दुसरा भाग हा जीवशास्त्राशी संबंधित का आहे. याचे अनुमान काढा.

**पोस्टर – 1**

**वनासंबंधी कायद्याचे चित्र**



**सदरचे चित्र कायद्याशी संबंधित आहे का? का आहे?**

वनांची तोड करण्यास अनेक बाबतीत बंदी आहे. वने तोडणाऱ्यास कायद्याने शिक्षा होते. वने तोडल्याने त्या व्यक्तिला तुरुंगवासाची शिक्षा होते. अशा उदाहरणाने कायद्याचे ज्ञान होते. म्हणून वने हा न्यायाशी संबंधित आहे.

"वने तोडा आणि तुरुंगात जा"

Notes

**पोस्टर – 2**

**वनासंबंधी चित्र**



वने हेच जीवन

**सदर चित्र जीव शास्त्राशी संबंधित कसे आहे?**

हवा–पाणी हा सजीवाच्या प्रमुख गरजा आहेत. वने हा सजीवांचा अविभाज्य भाग आहे. वनांपासून सजीवाला ऑक्सिजन मिळतो. सजीवांची ती गरज आहे. चित्राकडे पहा स्वासोच्छवासासाठी वने ऑक्सिजन देतात. सजीवांच्या गरजा हा जीवशास्त्राचा भाग आहे हे सदरच्या चित्रातून समजते.

हवा म्हणजे जीवन

पाणी म्हणजे जीवन

वरील चित्राप्रमाणे अनेक चित्रे तयार करून वनांचा अन्य विषयाशी असलेला संबंध स्पष्ट करता येईल.

**कार्यावर आधारित अध्ययन गृहकार्य :**

सोबत विद्यार्थ्यांना विविध गृहकार्य दिलेली आहेत. शिक्षकांनी त्यासाठी मार्गदर्शन करावे. मित्रांनो अगदी गंमतीशीर कार्य दिलेले आहेत. कामपूर्ण करून वर्गात सादर करा.

1) गणित, भाषा आणि विज्ञानाशी संबंधित, परस्परांशी नाते असलेले चित्र तयार करा.
2) आपली ही सामाजिक विज्ञानातील समस्या आहे. कायदा, राज्यशास्त्र, गणित, आरोग्य विज्ञान तसेच अर्थशास्त्र संबंधित चित्र तयार करा.
3) गणितातील टक्केवारी ही संकल्पना घ्या. या विषयाचा अन्य सहा विषयांशी असलेल्या सहसंबंधी संकल्पना तयार करा.
4) इयत्ता VII CBSE अभ्यासक्रमातील भूगोल, इतिहास समाजशास्त्र, राजकीय जीवन या तीन पाठ्यपुस्तकातून तीस ते चाळीस संकल्पना या विषयात सर्वसाधारण (common) आहेत. याचा शोध घ्या.

**आपली प्रगती तपासा – 5**

**प्रश्न :** इतिहास विषयाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप स्पष्ट करा.

**टीप :** (सोबतच्या जागेत उत्तर लिहून पाठाच्या शेवटी दिलेल्या उत्तराशी पडताळणी करा.)

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

## 1.7 सारांश

सामाजिक विज्ञान विषयाचे स्वरूप समजण्यासाठी सदरचा पाठ आहे. सदर प्रकरणामध्ये शास्त्रीय चर्चा व उदाहरणे देऊन अनुभवातील उदाहरणांनी एक दृष्टी येईल. या पाठातून विद्यार्थ्यांना सामाजिक विज्ञानाची संकल्पना, विषयाची स्थिती, काळानुरूप बदललेली सामाजिक स्थिती समजण्यास मदत होईल. या पाठातील प्रमुख अध्ययन मुद्दे खालीलप्रमाणे –

विस्तीर्ण अशा सामाजिक व्यवस्थेमध्ये मानवी संबंध व मानवी नाते हे सामाजिक विज्ञानातून समजण्यास मदत होईल. सामाजिक विज्ञान हा औपचारिक विज्ञान म्हणून उदयास आला. (उच्च

Notes

शिक्षण व विद्यापीठ शिक्षण) आठराव्या शतकात विज्ञान, औद्योगिकरण आधुनिकीकरण यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे लोकशाही, सामाजिक नागरिकरण या गुणवत्तांचा तरुणांमध्ये विकास व्हावा हा हेतू आहे. गेल्या शंभर वर्षामध्ये जागतिक अभ्यासक्रमात सामाजिक विज्ञानाचा समावेश झाला तसा भारतातही हा समावेश करण्यात आला.

उच्च शिक्षण, माध्यमिक शिक्षणामध्ये साामजिक विज्ञानामधील विविध विषय आहेत. उदा. इतिहास, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, न्याय शास्त्र इ. ऐच्छिक विषय म्हणून शिकविले जातात. परंतु प्राथमिक शिक्षणामध्ये मात्र, मूलभूत विषय म्हणून समाजशास्त्र हा विषय शिकविला जातो.

सामाजिक विज्ञानामधील विषय हे प्राचीन संस्कृतीपासून आजच्या संस्कृतीपर्यंतच्या विषयांचा समावेश होतो. प्राचीन व मध्ययुगीन समाजाचा अभ्यास हा अनौपचारिक स्वरूपाचा आहे. तर मध्ययुगानंतर आधुनिक समाजाचा अभ्यास हा औपचारिक आणि सूत्रबद्ध सुसंगत असा आहे. भारतात सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाचा समावेश वैदिक काळ, उपनिषदांपासून आहे. सध्याच्या अभ्यासक्रमातील महत्त्वाचा भाग आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकरण, आधुनिकीकरणाचा वेगाने होणाऱ्या विकासामुळे कामगारांची पिळवणूक, लोकसंसख्या समस्या, गुन्हेगारीत वाढ या नवीन सामाजिक समस्या निर्माण झाल्या त्यामुळे गुन्हेशास्त्र, लोकसंख्याशास्त्र इ. नवीन विषय उदयास आले.

सामाजिक विज्ञान विषयात अनेक विषयांचा समावेश होतो. राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, कायदे शास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल इत्यादी विषय असून शालेय अभ्यासक्रमात त्याचा समावेश असून विविध विषयांचे एकत्रिकरण समाजशास्त्रामध्ये घेतलेले आहे. इतिहास-भूगोल या सारख्या विषयांतील आशय घेतलेला आहे.

सामाजिक विज्ञान हा विषय आंतरशाखीय (Interdisciplinary) आणि सहसंबंधी असून त्या विषयांचा परस्परांशी कार्यात्मक संबंध आहे. तसेच त्यांचा प्राकृतिक विज्ञान, गणितशास्त्र, जीवशास्त्र इ. विषयांचा समावेश होतो. त्यामुळे सामाजिक विज्ञानाचा अभ्यासक्रम हा एकात्मक असायला हवा. त्या बाबत सविस्तर माहिती पुढील प्रकरणात आहे.

## 1.8 संक्षिप्त

**पुनरुज्जीवन (Renaissance) :** ज्ञानाचे पुनरुज्जीवन अशा अर्थाने वापरला जातो. आठराव्या शतकामध्ये आणि त्यानंतरही ज्ञान जागृती झाली. विविध क्षेत्रामध्ये उदा. सामाजिक जीवन, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, विज्ञान इ. क्षेत्रातील जागृती झाली. विज्ञानाची झपाट्याने झालेली वाढ, औद्योगिकता, आधुनिकीकरण यांच्यामुळेच जागृती झाल्याने आधुनिक जग झाले आहे.

**गांधीजींची मूलभूत शिक्षण संकल्पना (Gandhiji's basic education) :** 22 व 23 ऑक्टोबर 1937 या दिवशी वर्धा येथे National Education Conference झाली. त्यामध्ये गांधीजींनी ही योजना मांडली. तिला मूलभूत शिक्षण किंवा वर्धा-योजना म्हणून ओळखली जाते. मूलभूत गरजावर आधारित भारतीय मुलांना धडे मिळावेत अशी गांधीजींची कल्पना होती.

**आर्थिकमंदी (Economic depression) :** आर्थिक घसरण किंवा मंदी अशा अर्थाने शब्द प्रयोग होतो. आर्थिक संस्था, माल, सेवा, व्यापार, यांमध्ये मोठी घसरण होते. सन 1930 या वर्षाला आर्थिक मंदीचे वर्ष समजले जाते. जगभरच या मंदीचा फटका बसलेला होता.

## 1.9 नमुना उत्तरे

**प्रश्न 1 – उत्तर :** सामाजिक विज्ञान (2006) नुसार उच्च प्राथमिक स्तरावरील उद्दिष्ट्ये

- मानव व मानवेतर सजीव सृष्टीला पृथ्वी हेच वस्तीस्थान आहे. यांची कल्पना विकसित करणे.

- आपला परिसर, राज्य देश यांचा अभ्यास जागतिक संदर्भाने करणे.
- भारताचा भूतकाळ हा अभ्यास जागतिक संदर्भाने करणे.
- देश पातळीवरील घडणाऱ्या सामाजिक गतीशीलता व राजकीय संस्थांच्या कार्यपद्धतीचा परिचय करून घेणे.

**प्रश्न 2 – उत्तर :** प्राचीन भारतीय संस्कृती, शिक्षण पद्धती सामाजिक विषयातून अभ्यासने, नैतिक अध्यात्मिक, सामाजिक मूल्ये कल यांचा भारतीय प्राचीन संस्कृती व तत्त्व मार्गदर्शन करतात. वेद, उपनिषद, स्मृती, पुराणे, रामायण महाभारत यामधून समाजाला जीवनाची तत्त्व समजतात. कौटिल्याचे अर्थशास्त्र, विषणूशर्मांचे पंचतंत्र हे प्राचीन भारतीय रचनाकार आहेत यांचा सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा प्राचीन भारताची साक्ष देतात.

**प्रश्न 3 – उत्तर :** विज्ञान, तंत्रज्ञान, संपर्कसाधने आणि अनेक गोष्टींच्या वेगामुळे सध्या साामजिक बदल वेगाने होत आहेत. यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी साामजिक विज्ञानाच्या विविध शाखा निर्माण झालेल्या आहेत. आठराव्या एकोणीसाव्या शतकामध्ये, समाजसेवा, लोक प्रशासन, गुन्हे शास्त्र, मानसशास्त्र, जनसंख्याशास्त्र, या सारख्या नव्या विषयांचा उदय अलिकडच्या काळात झालेला आहे. आठराव्या एकोणीसाव्या शतकात लोकशासंख्या ही समस्या नव्हती परंतु लोकसंख्या वाढीमुळे सामाजिक जीवनावर मोठा परिणाम झालेला आहे. त्यामुळे लोकसंख्या शास्त्र हा साामजिक विज्ञानामधील महत्त्वाचा अभ्यास विषय झालेला आहे. तसाच अनेक विषयांचा उदय या साामजिक समस्येतून झालेला आहे.

**प्रश्न 4 – उत्तर :** सामाजिक अभ्यास, तीन क्षेत्र

1) क्षेत्रातील विषयाची संख्या

2) विषयांचा परस्परातील कार्यात्मक संबंध

3) विषयांच्या क्षेत्रातील कार्यात्मक संबंध व विविध विषयातील घटकांचा परस्परांशी असलेला संबंध

राज्यशास्त्र, भूगोल, न्यायशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास या पाच विषयांचा समाजिक विज्ञानामध्ये समावेश होतो.

**प्रश्न 5 – उत्तर :** इतिहास विषय हा आंतरशास्त्रीय स्वरूपाचा आहे. कारण इतिहासाचा अभ्यास करताना अन्य सामाजिक विज्ञानातील विषयाचाही अभ्यास करावा लागतो. उदा. आर्थिक इतिहास, राजकीय इतिहास इत्यादी. त्याचप्रमाणे सामाजिक विज्ञानाशी थेट संबंध नसणारेही विषय अभ्यासावे लागतात. उदा. पदार्थविज्ञान इतिहास, वनस्पतीशास्त्र इतिहास, प्राणीशास्त्राचा इतिहास, गणिताचा इतिहास, विविध भाषांचा इतिहास हे सर्व घटक इतिहासाशी संबंधित आहेत म्हणून त्याला Interdisciplinary असे म्हणतात.

## 1.10 अवांतर संदर्भ साहित्य


Barker, E. (1967). *Principles of social and Political Theory*. Oxford: Oxford University Press.

Basantia, T. K., and Purkayastha, B. (2010). Competency Based Teaching Learning Process at Primary Level : An Analysis. In K. D. Gaur, R. Prasad and H. Bergal (Eds.), *Globalization and Economy*. New Delhi : Sunrise Publication.

Basantia, T. K. (2003). Effect of Activity Based Joyful Learning Approach in Achieving Interdisciplinary MLL Competencies through Teaching of Environmental Studies at Primary Level. M. Phil. Education. Utkal University.

Basantia, T. K. (2006). Effect of Multi- Dimensional Activity based Integrated Approach in Enhancing Congnitive and Creative Abilities in Social Studies of Elementary School Children. Ph. D. Education. Utkal University.

Coombs, P. H. (1985). *The World Crisis in Education.* New York: Oxford University press.

Delors, J. (1996). Learning the Treasure within-Report to UNESCO of the Inter national Commission on Education for Twenty first Century. UNESCO.

Govt. of India. (1952-53). Secondary Education Commission (1952-53). New Delhi : Ministry of Education.

Govt. of India (1966). the Education Commission (1964-66). New Delhi : Ministry of Education.

Govt. of India. (1986). the Education Commission (1964-66). New Delhi : Ministry of Education.

Govt. of India. (1986) National Policy on Education (1986). New Delhi: MHRD Jarolimek, J. (1962). *Social Studies in Elementary Education.* New York: The Mac Millan Company.

Mishra, S., and Basantia, T. K. (2003). The Modalities of Teachers' empowerment for organizing Creative activities for Development of Various abilities in Elementary school Children. *The Primary Teacher, 28(4), 43-47.*

NCERT. (1975). *The Curriculum for Ten year School : A Framework.* New Delhi : NCERT

NCERT. (1988). *National Curriculum for Elementary and Secondary Education.* New Delhi : NCERT.

NCERT. (2006). Position Paper-National Focus Group on Teaching of Social Sciences. New Delhi : NCERT.

NCERT. (2000). *National Curriculum Framework for School Education.* New Delhi : NCERT

NCERT. (2005). *National Curriculum Frame Work-2005.* New Delhi : NCERT.

Panda. B. N.. and Basantia, T. K. (2006). Civic awareness : A recurring Challenge of Present day Education - Educational strategies for its Enhancement. *The Social Science International, 22(1). 84-96.*

Ross, D. (1991). The Origin of American Social Science. New York : Cambridge University Press.

Traill, R. D., Logan, L. M. and Remington, G. T. (1968). *Teaching the Social Sciences : A Creative Direction.* Sidney : McGraw-Hill Company.

## 1.11 पाठावरील प्रश्न

1. तुमच्या राज्यातील सामाजिक विज्ञानाचे पाठ्यपुस्तक घेवून CBSE, ICSE या पुस्तकांतील आशयातील समानता व भेद यांची तुलना करा. अभ्यासक्रमातील समानता आणण्याचे उपाय सूचवा.
2. सामाजिक विज्ञान विषयाच्या प्राथमिक इयत्तेतील वर्ग अध्यापनाचा लेखन प्लॅन तयार करा. त्याच आशयावर आंतरशाखीय व एकात्मिक पद्धतीचा अवलंब करा.
3. सध्या एकविसाव्या शतकाचा प्रारंभच आहे. सध्याच्या काळापासून एकविसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत कोणते सामाजिक प्रश्न निर्माण होतील आणि ते सोडविण्यासाठी उपाय सूचवा.

# घटक 2 : सामाजिक शालेय अभ्यासक्रम

**स्वरुप :**

2.0 प्रस्तावना
2.1 अध्ययन उद्दिष्ट्ये
2.2 सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावर परिणाम करणारे घटक
2.2.1 वसाहतवादाचा वारसा व राष्ट्रीय स्वरूप
2.2.2 स्वातंत्र्यानंतरची सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमातील उत्क्रांती
2.2.3 राष्ट्रीय एकात्मता आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य
2.2.4 निधर्मवाद आणि समाजवाद
2.2.5 सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावरील दुय्यम घटकांचा परिणाम
2.2.6 लिंग, जात व आदीवासीचे स्वरूप
2.2.7 सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील चित्र.
2.2.8 राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाची सध्याची विचारधारा
2.3 सारांश
2.4 आपली प्रगती तपासा
2.5 संदर्भ साहित्य
2.6 पाठावरील प्रश्न

## 2.0 प्रस्तावना

पहिल्या पाठामध्ये आपण सामाजिक विज्ञानाचे स्वरूप त्यातील घटक त्याची निर्मिती व संकल्पना पाहिलेली आहे. समाजाची सध्या स्थितीही पाहिलेली आहे.

सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाच्या स्थितीचा विचार केलेला आहे का? सध्याचा अभ्यासक्रम कसा प्रगत झाला? विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये सामाजिक विज्ञानाचे विस्तृत स्वरुपापैकी काहीच प्रकरणांचा समावेश आहे. प्रत्यक्षात सामाजिक विज्ञान अभ्यासाची शैक्षणिक उद्दिष्टे हा पाया आहे. सामाजिक विज्ञानाचा अभ्यासक्रम निश्चित कोणी केला? त्यामागची प्रेरणा आणि कल्पना कोणाची? त्यासाठी काही गोष्टी समजून घेवू. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी विविध विषयातील प्रकरणे सामाजिक विज्ञान विषयात आहेत. सदरच्या पाठामध्ये या विषयावरील भारतीय अभ्यासक्रमावरील प्रेरणा व प्रभाव पाहणार आहोत. या विषयाच्या उद्दिष्टांचे परिक्षण करू.

## 2.1 अध्यापन उद्दिष्टे

**सदरच्या पाठ्य अध्ययनानंतर पुढील उद्दिष्ट्ये साध्य होतील.**

1. सामाजिक विज्ञान, अभ्यासक्रमाची प्रेरणा समजेल.
2. वसाहत राजवटीचा सामाजिक विज्ञान विषयावरील परिणाम
3. राष्ट्रवादाचा सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावरील परिणाम स्पष्ट होणे.
4. राष्ट्रीय एकात्मता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य या संकल्पनांचा सामाजिक विज्ञानावरील परिणाम स्पष्ट करणे.
5. निधर्मवाद, साम्यवद याचा सामाजिक विज्ञानावरील परिणामाचे परिक्षण करणरे घटक.
6. सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावरील दुय्यम घटकाचा प्रभाव स्पष्ट करणे.
7. सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात लिंग, जात, व आदिवासी यांची उदाहरणे अभ्यासणे

8. सामाजिक विज्ञान आणि आंतरराष्ट्रीय स्वरूप याची चर्चा करणे.
9. राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाची चर्चा करणे.

## 2.2 सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावर परिणाम करणारे घटक

सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावर विविध शक्ती, कल्पना, चळवळी, उत्क्रांती, वाद आणि संबंध यातून पर्यावरण आणि साधने यामधून या शास्त्राचा उदय झाला. भारतात एकोणिसाव्या शतकामध्ये इंग्रजी शिक्षणापूर्वी सामाजिक विज्ञान हा स्वतंत्र विषय नव्हता. ब्रिटिश राजवटीमध्ये ब्रिटिशांच्या अधिकाऱ्याबरोबर काही क्लार्क यांनी वसाहत राजवटीमध्ये अभ्यासक्रम तयार केला. दरम्यानच्या काळात राष्ट्रीय प्रवाह व भारतीय स्वातंत्र्याची चाहूल लागली, लोकशाही भारताची मूल्ये व पावित्र्य याचा सामाजिक विज्ञानामध्ये समावेश करण्यात आला. भारताची वैविध्यपूर्ण लोकसंख्या, त्यांचा विकास, आर्थिक व सामाजिक स्थिती, सामाजिक गोंधळ, संभ्रम याचाही परिणाम या विषयावर झालेला आहे. भारताचे जागतिक स्तरावरील स्थान, पर्यावरण, संसाधने, राजकारण, सत्तासंघर्ष, यांचा सामाजिक विज्ञानामध्ये समावेश होतो. भारतात अनेक समस्या उदयाला आल्या. लोकसंख्या विस्फोट, दारिद्र्य, समानता, पिळवणूक, विकास, सर्वसमावेशकता इत्यादी या विविध घटकांचा परिणाम अभ्यासक्रमावर झालेला आहे.

### 2.2.1 वसाहतकारांचा वारसा आणि राष्ट्रीय स्वरूप

ब्रिटिशकालील वसाहत काळात सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात अमूलाग्र विकास झाला. याच काळात सामाजिक विज्ञान हा स्वतंत्र अभ्यास विषय म्हणून उदयाला आला आणि त्यातील अभ्यासक्रम ठरविण्यात आला. भारतात इतिहास लिहिण्याची परंपरा खूप नाही. जे काही लिहिले ते ब्रिटिशांनी ब्रिटिश सरकारनेच भारताची लांबी रुंदी मोजण्यासाठी आधुनिक पद्धती वापरून सर्वेक्षण केले. तसेच जनगणनाही केली. त्यापूर्वी भारतातील अनेक बाबी, वस्तूस्थिती, आकडेवारी भारताला आणि जगालाही अज्ञात होती. त्यातून भारत आणि भारतीय प्रकाशात आले. या वसाहतवादींच्या समृद्ध ज्ञानाचा वापर देशाला झाला. या मिश्र आशयाचा वापर सामाजिक विज्ञानामध्ये झाला.

समृद्ध सिंधू संस्कृतीचा उगम भारतीय उपखंडात वायव्य भारतात इ. स. पूर्व 3300 ते 1300 दरम्यान झाला. ही भारताची प्राचीन संस्कृती समजली जाते. ही संस्कृती तांत्रिक दृष्ट्या प्रगत व सुसंस्कृत नागरी संस्कृती होती. आधुनिक जगाला सन 1826 मध्ये सिंधु संस्कृतीचा शोध लागला. ब्रिटिश अधिकारी चार्लस् मॅसॉन चालताना मोठ्या विटेवरून घसरले ते जे ठिकाण आजच्या हडाप्पाच्या जवळ आहे. त्यावरूनच त्या ठिकाणाची ओळख झाली. सन 1856 ते 1872 दरम्यान सर अलेक्झांडर कॅनिंगहॅम, हे भारतात पूरातत्त्व विभागाचे संचालक असताना हडाप्पाच्या जवळ काही ठिकाणी उत्खनन केले. त्या परिसराभोवती मिळालेल्या विटा स्थानिक लोक घरबांधणीसाठी वापरताना दिसले. सन 1865 मध्ये कराचीत लाहोरच्या लोहमार्गाच्या कामासाठी त्या विटाचा वापर केला. सन 1914 मध्ये सर जॉन मार्शल पुरातत्व विभागाचे संचालक म्हणून आले. त्यांना सर्वेक्षण करताना उत्खननामध्ये वॉटरप्रुफ असा तलाव आढळला आणि धान्याचे कोठारही सापडले.

आर डी बॅनर्जी पूरातत्व विभागाचे अधिकारी असताना सन 1921 – 22 मध्ये मोहेन जो. दरो चा शोध लागला त्यातून भारतीय उच्च संस्कृतीच्या इतिहासाची माहिती मिळाली.

भारतीय इतिहासातील दुसरे उदाहरण घेऊ सम्राट अशोकाचे कार्य राज्यकर्ता म्हणून जागतिक इतिहासात नोंदविलेले आहे. ब्रिटिश, इतिहासकार H.G.Well लिहितात. काही संदर्भहिन दंतकथा सोडल्या तर दहा हजार राज्यकर्त्यामध्ये अशोकाचे स्थान अढळ आहे. काही इतिहासाला धरून नसणाऱ्याही गोष्टी आहेत. सन 1837 मध्ये जेम्स प्रिन्सेस यांनी दिल्लीतील स्तंभालेखावरील

लेखावरून माहिती जमा केली. प्रिन्सेसच्या संदर्भावरून अनेक माहिती उपलब्ध झाली. सदरची माहिती भारतामध्ये सर्वत्र पसरली, पाकिस्तान, अफगाणिस्तान, नेपाळ, राजा स्वत: Beloved of the king piyadasi म्हणजेच राजा अशोक हे 1915 मध्ये ज्ञान झाले, पुराणवास्तूतून मिळालेल्या पुराव्यावरून अशोकाचे श्रेष्ठत्व समजते. अशी सर्व संशोधने ब्रिटिश राजवटीमध्ये झाल्यामुळे भारतीय इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. वरील उदाहरणावरून तुम्हास काय वाटते!

ब्रिटिश अधिकारी, प्रशासकांना भारतीय इतिहास लिहिऱ्याची जाणिव झाली. वॉरन हेस्टिंग्जने सन 1784 मध्ये सर विल्यम जोन्स (इस्ट इंडिया कंपनीचे ऑफिसर) कलकत्ता हाय कोर्टाचे प्रमुख न्यायाधीश यांनी भारतीय इतिहास लिहिण्याचे कायदेशीर फर्मान काढले. विल्यम जोन्स यांची असामान्य बुद्धिकौशल्याची ख्याती होती. त्यांनी एसियाटिक सोसायटी ऑफ बेंगालची स्थापना करून भारतीय इतिहास लिहिण्याचे निश्चित केले. त्याला विल्यम जोन्स यांनी पाठबळ दिले. सन 1788 मध्ये एशिएटिक रिसर्च जर्नल सुरू केले. या प्रकाशनातून प्राचीन वैभव प्रकाशात आले. अशाच प्रकारच्या मुंबई, चेन्नई (मद्रास) येथे संस्था स्थापन केल्या. सन 1833 मध्ये जेम्सप्रिन्स हे एसियाटिक सोसायटीचे सेक्रेटरी झाले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे सन 1934 मध्ये ब्राह्मी व खरोष्टी लिपीचा उलगडा केला व सन 1937 मध्ये पियदासी आणि अशोक यातील साम्याची ओळख झाली. आजही एशियाटिक सोसायटीचे कार्य बहूमोल समजले जाते. ब्रिटिश राजवटीतील अनेक पुराणवास्तूंचा शोध घेणे बाकी होते. सन 1861 मध्ये कॅनिंगहेम बंगाल इंजिनिअर्सचा सेकंड लेफ्टनंट याची नेमणूक पूर्ण वेळ पुराणवस्तू सर्व्हेअर म्हणून नेमणूक झाली. पुराणवास्तू सर्वेक्षण आणि संवर्धन हा एक स्वतंत्र विभागच करण्यात आला.

जेम्स मिलने पहिल्यांदाच भारतीय इतिहासावर लिखाण केले. त्याने कधीही भारताला भेट दिलेली नव्हती. पण वस्तुनिष्ठपणे इतिहास लेखन केले. त्याने सन 1806 मध्ये प्रारंभ केला व 1818 लिखाणाला प्रसिद्धी दिली. "History of British India." प्रसिद्ध केले अनेक ब्रिटिश प्रशासकांनी या लिखाणामध्ये मदत केली. त्यामध्ये मेजर जनरल मालकोन, कॅप्टन ग्रँड डफ (History of the Marathas, 1826) जनरल ब्रिग्ज (History of the Rise of Mohammedan Power in India. 1829) माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन (History of India 1841) जोसेफ कॅनिंगहम (History of sikh 1849) इत्यादी लेखन हे भारतीय. इतिहासाच्या ज्ञानाचे दर्जेदार साहित्य. जेव्हा भारतात इंग्रज शिक्षण पद्धती राबविण्यात आली तेव्हा सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात History of India written by British writer असा प्रारंभ झाला.

ईस्ट इंडिया कंपनीने सर्वे ऑफ इंडियाची स्थापना सन 1767 मध्ये केली. एक – एक भागाचे सर्वेक्षण करून नकाशे तयार केले त्याचा उपयेग लष्करासाठी तसेच लोकांसाठी होता. या समृद्ध माहितीचा एक साधन म्हणून मोठा उपयोग झाला. नैसर्गिक संपदांचा शोध घेणे, व्यापार, प्रशासन आणि विकासासाठी नियोजन यासाठी उपयोग झाला. भूमी आणि लोकांची माहिती या सर्वेक्षणातून झाली. भारताचे सर्वेक्षण करण्याचा ईस्ट इंडिया कंपनीचा काय उद्देश होता हे लक्षात येते का?

आजच्या सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात, भारताची भूमी, लोक, नद्या, पर्वत, वने, शेती, आर्थिक स्थिती, लोकसंख्या, धर्म, शासन आणि अनेक गोष्टींचा समावेश आहे. याचा उद्देश समजला असेल. ही सर्व क्षेत्र व त्याचे ज्ञान व कल्पना सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमातून व्हावी यासाठीच इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र हे विविध विषय शिकावे लागतात.

भारत हा विविधतेचा देश आहे हे लक्षात आले असेल. भारतीय जनगणना हे भारतीयांच्या माहितीबाबतचे महत्त्वाचे साधन आहे. एकूण लोक, स्त्री – पुरुष, साक्षरता, इत्यादी माहितीतून समाजाचे चित्र समजते. सन 1872 मध्ये पहिल्यांदा भारतीय जनगणना ब्रिटिशांनी केली त्यानंतर सन 1881 पासून माहिती उपलब्ध होते. दहा दहा वर्षांनी जनगणना होते. त्याचा परिणाम सामाजिक

Notes

विज्ञान अभ्यासक्रमावर होतो. सन 1835 पासून ब्रिटिश शिक्षण पद्धती भारतात राबविण्यात आली. त्यामध्ये वेस्टर्न सायन्स व तंत्रज्ञान, त्याचप्रमाणे निसर्ग व समाज यांचा काटेकोर अवलंब होता. वूडचा खालिदा (1854) मध्ये आधुनिक शिक्षण पद्धती आणली त्यात विविध पातळीवर प्रशासन व व्यवस्थापन याचा समावेश होता. सन 1857 मध्ये बॉम्बे (मुंबई), कलकत्ता (कोलकाता), मद्रास (चेन्नई) या तीन विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. ब्रिटिशांकडेच व्यवस्थापन, नवीन वाहतुक व संदेशवहन, रेल्वे, टेलिग्राफ इत्यादीचे श्रेय जाते. न्याय व्यवस्था व कार्यवाही यांचे विभाजन करण्यात आले. सामाजिक सुधारणा करण्याचे ठरविले, मुलींचे शिक्षण, सतीची चाल बंदी यांचा प्रारंभ झाला. त्याचवेळी भारतीय संस्कृती व वारसा यांमध्येही लक्ष घातले. भारतातील अनेक ग्रंथांचे युरोपियन भाषांमध्ये भाषांतर करून भारतीय संस्कृती प्रकाशात आणली. फ्रेड्रिक मॅक्स म्युलर या जर्मन साहित्यकाराने यात पुढाकार घेतला याने पूर्वेकडील पवित्र पुस्तके, (Sacred books of the East) अशी क्रमशा प्रकाशने केली.

अशाप्रकारे पुराण वस्तु, इतिहास, संस्कृती, भारतीयांचा वारसा यांचा विविध क्षेत्रात विकास झाला. नैसर्गिक भूमी व संपदा, लोकसंख्या गणना, भारतीयांची बदलती प्रशासने, शिक्षण, वाहतूक संदेशवहन, सामाजिक सुधारणा या सर्वांचा परिणाम हा सामाजिक विज्ञान विषयावर झालेला असून त्यांचा अभ्यास या विषयात केला जातो.

ब्रिटिश सरकार वरील विविध गोष्टींमध्ये व्यक्तिगत हेतूने देशाच्या विकासासाठी प्रयत्नशील नव्हते. त्यातील अनेक गोष्टी या भारतातील ब्रिटिश राजवट असे समर्थन करतात. भारतात त्यांचे पाय भक्कम करायचे होते. रुडयार्ड किप्लिंग White man’s burden या पुस्तकातून लिहितात. गोऱ्या लोकांनी राजवट करताना स्थानिकाचेही हीत लक्षात घ्यावे अशी भावना व्यक्त करतात. समाज व भारतीय संस्कृतीवर कमी प्रमाणात प्रकाश टाकलेला आहे असे अनेक भारतीयांना वाटते.

**मॅकॉलेच्या शब्दात :**

मला संस्कृत किंवा अरबी भाषेचे ज्ञान नाही. परंतु त्याला अचूक स्थान देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अरेबिक व संस्कृतची भाषांतरे वाचली आहेत. पूर्वेकडील लोकांच्या प्रभुत्वाबद्दल मला जाणीव आहे. मला पूर्वेकडील साहित्य शिकण्याची इच्छा आहे. युरोपियन ग्रंथालयात पूर्वेकडील भारतीय व अरबीयन साहित्य भरलेले. एकही कपाट पाहिलेली नाही. पाश्चात्य साहित्याची शिफारस करणे, हे समितीचे स्वाभाविक काम आहे. परंतु पूर्वेकडील योजनाही शिक्षणामध्ये आणण्याची शिफारस आहे. **(मेकॉलेची टिपणी 1835)**

मेकॉलेच्या : विधानावरून आपणास काय वाटते।

सदर्भ : थॉमस बबिंग्टन मेकॉले “Minutes on Education Through Indian” Eayes : Living Tradition, Donald J. Johnson, et al. (New York: CITE Books, 1992).

भारतीयांची जीवन पद्धती आणि संस्कृतीचे लेखन करताना ब्रिटिश आणि युरोपियनांनी आपले श्रेष्ठत्व दाखवून भारतीयांबद्दल नकारात्मक लिखान केलेले आहे. यामधून भारतीयांना ब्रिटिश राजवट कशी योग्य आहे याचेच निर्देशक आहे.

देश प्रेमींनी भारतीयाचा इतिहास आणि संस्कृतीबद्दल भारतीयांनाच लिहावा असे वाटले.

ऐतिहासिक घटनांचे वेगळ्या शब्दात विश्लेषण करता येईल असे वाटते का? सन 1857 चे स्पष्टीकरण कसे करतात. 1857 बद्दल ब्रिटिश इतिहासकार शिपायांचे बंड म्हणून वर्णन करतात. तर पहिला स्वातंत्र्य लढा असे भारतीय राष्ट्रीय इतिहासकार म्हणतात. असे म्हणता येईल का? या विधानांचे तुमच्या शब्दात वर्णन करा.

ब्रिटिशांनी त्यांच्या पद्धतीने भारतीय संस्कृती, इतिहास व वारसा यांचे वर्णन केले. भारताकडे पाहताना आर्थिक उद्देश, राजकीय परिपक्वता आणि लोकांची प्रेरणा या दृष्टीने पाहतात. भारतीयांच्या

नजरेतून भारतीय राष्ट्रीय इतिहासावर भर देणारे स्वामी विवेकानंद हे पहिले भारतीय. त्यांच्या लक्षात आले की, ब्रिटिशांनी लिहलेली इतिहास हा भारतीयांच्या मनाचे खच्चीकरण करणारा, आणि पराभवाचा आहे. परकीयांना आमच्या छोट्या, छोट्या परंपरा आणि रुढी कशा माहीत असतील? आमचा धर्म व तत्वज्ञान, विश्वासहर्यता आणि पूर्वगृहरहित इतिहास आहे. म्हणून भारतीयांसाठी लिहिलेला भारतीय इतिहास भारतीयांनी लिहावा. राष्ट्रीय नेत्यांना खात्री झाली की भारतीय इतिहास लिहिताना ब्रिटिश लेखकांनी भारतीयांकडे नकारात्मक दृष्टीने समाज व्यवस्थेकडे पाहून वर्णन केलेले आहे. जातीव्यवस्था, अस्पृश्यता, संस्कृती, उच्च भाषा, परकीय आक्रमणांचा प्रतिकार कसा केला याचा त्यांना विसर पडला. सामाजिक बळ व पारदर्शकता या आधारावर असलेली सामाजिक रचना लाखो वर्षापासून चालत आलेली आहे. संपूर्ण उपखंडात संस्कृतभाषा आणि भाषाशैली चालत आलेली आहे. देशप्रेमींना भारतीय संस्कृतीचे मुल्ये, परंपरा हीच भारताची ओळख आहे हे दाखवून द्यायचे होते. बकीमचंद्र चटर्जी हे ब्रिटिश सेवेमध्ये अधिकारी होते. त्यांनी भारतीय संस्कृती व धर्माचे प्रखरपणे समर्थन केले. त्यांनीच वन्दे मातरम, हा नारा सर्वत्र लावला.

राष्ट्रीय विचार सरणीच्या काही नेत्यांनी सामाजिक विकासाचे पर्यायी मॉडेल उभे केले. गोखलेंनी सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची मागणी केली. बडोद्याचे सयाजीराव गायकवाडांनी आपल्या राज्यात सक्तीचे प्राथमिक शिक्षण केले. गांधीजींनी मूलभूत शिक्षणाची संकल्पना मांडली. अनेकांनी देशभक्तीचे आणि स्वत:चे भवितत्व घडविणारे शिक्षण देणाऱ्या संस्था काढल्या आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आमच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत हे शिकवू नये. इंग्रजांचे कारकून बनविणारे शिक्षण नको तर भारतीय बनविणारे शिक्षण असावे. स्वामी दयानंदाची 'दयानंद अँग्लो वेदिक' चळवळ ही सामाजिक धार्मिक व शैक्षणिक सुधारणा चळवळ सुरू झाली. आर्यसमाज आणि ब्राह्मो समाजाने सामाजिक व धार्मिक चळवळ घडवून आली. भारतीय राष्ट्रीय हा गाभा विचारात घेवून पर्यायी शिक्षणाचा विचार केला.

महात्मागांधींनी आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे मॉडेलची कल्पना मांडली ज्यामध्ये औद्योगिक व पाश्चात्यीकरणास वाव नव्हता. त्यांचा जास्तीत जास्त सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्यावर भर होता. प्रत्येक खेडे स्वावलंबी झाले पाहिजे आणि प्रत्येकाला सन्मानपूर्वक पिळवणूक रहित वागणूक मिळाली पाहिजे. राष्ट्रीयचळवळ स्वातंत्र्याची मागणी करीत होती त्यातूनच राजकीय सत्ता आणि पूर्ण स्वातंत्र्याची मागणी सुरू झाली. राष्ट्रीय भावना आणि पर्यायी मागण्याचाही सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावर परिणाम झाला.

**कृती 1**

1. भारतीय लोकांमधील असलेली विविधतेची उदाहरणे द्या.
2. भारतीयांमध्ये असलेली विविधता हे आव्हान आहे असे वाटते का? ती संधी वाटते का?
3. नजीकच्या झालेल्या जनगणनेची तालुक्याची आकडेवारी मिळावा. तुमच्या परिसरात राहणाऱ्या लोकसंख्येची वाढ किती झाली. कोणत्या धर्माचे समाजातील जास्त लोक आहेत? त्यांची साक्षरता, स्त्री पुरुष प्रमाण इत्यादी माहिती तयार करा. त्यानंतर त्या आकडेवारीवरून गुणवैशिष्ट्ये व जनस्थिती यांचे विश्लेषण करा.

**आपली प्रगती तपासा 1**

1. भारताचा इतिहास लिहिणारी पहिली व्यक्ती कोण?

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

Notes

2. अशोकाच्या स्तंभावरील माहितीचे पहिल्यांदा स्पष्टीकरण करणारी व्यक्ती कोण?

3. सर्वे ऑफ इंडिया का स्थापन झाले?

4. कोणत्या भारतीय राज्यकर्त्याने प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले?

### 2.2.2 स्वातंत्र्यानंतरची सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाची उत्क्रांती

स्वातंत्र्यामुळे जबाबदारी वाढली आणि आमच्या समस्या, आमच्या पद्धतीने सोडविण्याची जबाबदारी आली. त्यासाठी उत्तम ज्ञान आणि कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धती आणणे गरजेचे होते. भारताला प्रचंड परिश्रमातून स्वातंत्र्य मिळाले. त्यासाठी स्वातंत्र्य लढ्याची कल्पना नव्या लोकशाही भारतीयांमध्ये मूल्यांची जोपासना व्हावी. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व, या कल्पना राज्य घटनेमध्ये नमूद केलेल्या आहेत. ब्रिटिश काळातील उच्चनिच्चता जाती, लिंगभेद आणि परकीयंचा अनुभव होताच. भारताचे स्वातंत्र्य आणि दोन देशांचे विभाजन हे अतिशय वेदनादायक होते. हजारो लोकांच्या कत्तली झाल्या, अशांततेने भरलेले स्वातंत्र्य होते. लोकशाही रुजावी, त्यातून नेतृत्व गुणांचा विकास व्हावा आणि नव्या सामाजिक रचनेची मूल्ये त्यांच्यामध्ये यावीत अशी कौशल्ये यावीत. सन 1948-49 मध्ये विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना स्वातंत्र्यानंतर लगेचच करण्यात आली. सामाजिक रचनेवर आधारित शिक्षण मिळावे. त्यामधून, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक संस्थांचा सामवेश असावा. अशीही शिफारस करण्यात आली की लोकशाहीची मूल्ये रुजविताना सांस्कृतिक वारसा आणि पूर्वीचा काळ व सध्यास्थितीची समज यावी. सन 1952-53 मध्ये माध्यमिक शिक्षण आयोग स्थापन झाला आणि त्यामध्ये लोकशाही नागरिकत्त्व, नेतृत्व हीच मूल्ये दिलेली आहेत. भारतीय शिक्षण आयोग 1964-66 स्थापन झाला आणि शिक्षणामध्ये क्रांतीची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. शिक्षण हे जीवनासाठी आवश्यक व राष्ट्रीय प्रेरणा आकांक्षा देण्यासाठी असावे. शिक्षण हे सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक मूल्ये नीति व आध्यात्मिक पायावर असावे अशी शिफारस केलेली आहे.

सन 1986 मध्ये सर्वंकष शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण जाहिर झाले. राष्ट्राच्या आकांक्षा आणि मूल्ये या धोरणामध्ये व्यक्त करण्यात आलीत. या धोरणानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये गाभा हा सर्वसाधारण ठेवून इतर घटकांमध्ये परिवर्तन सूचीत केलेले आहे. या गाभ्यामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास घटनात्मक बंधने आणि इतर तपशील हा राष्ट्रीय ओळख म्हणून विकसित करण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

विषयाच्या पलिकडे जावून भारतीय सांस्कृतिक वारसा, सर्व माणसे समान आहेत ही भावना, लोकशाही, निधर्मभाव स्त्री पुरुष समानता, पर्यावरण रक्षण, सामाजिक अडथळे दूर करणे, छोट्या कुटुंबाचे आचरण, शास्त्रीय मनोवृत्ती या गाभा घटकांचा समावेश त्यामध्ये व्हावा. लोकशाहीसाठी

शैक्षणिक कार्यक्रम राबविताना निधर्म मूल्ये काटेकोरपणे राबवितात. याच गाभा घटकातून सामाजिक विज्ञान विषयाच्या अभ्यासक्रमाला दिशा मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. स्वतंत्र्य भारताला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. गरीबी, निरक्षरता मागासलेपणा, सामाजिक व जातीय विभाजन इ. समस्या होत्या. या समस्या हाताळणे हे राष्ट्रीय प्राधान्य होते. अधिक अन्नधान्य उत्पादन वाढविणे, निरक्षरता नष्ट करणे, वाढती लोकसंख्या, देशातील व देशाबाहेरील संकटे यांच्याशी लढा होता. लोकशाही व राज्यघटनेनुसार लोकांच्या ही मनामध्ये आशा होत्या. विद्यार्थी ज्या समाजामध्ये राहतो त्याला सामजिक समस्यांची जाणीव व्हावी. हा सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाचा हेतू आहे.

## 2.2.3 राष्ट्रीय एकात्मता आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य

भारतीय समाजाच्या विविधतेमध्ये समृद्धी आहे. परंतु त्यामुळेच बहुविधता हे एक आव्हान आहे. अनेक लोकांच्या भाषा भिन्नता, पेहराव भिन्नता, पूजाभिन्नता, तत्त्वज्ञानात भिन्नता, सामाजिक भिन्नता, व्यवसाय भिन्नता, प्रत्येकांची उत्पन्न भिन्नता, त्यामुळे प्रत्येकाला भारत हा आपला देश आहे असे वाटावे हा शिक्षणाचा मुख्य हेतू आहे. राष्ट्रीय एकात्मता आणि भावनिक एकात्मता  यासाठी इतिहासामध्ये अनेक पाठात समावेश आहे. अतिशय कष्ठातून स्वातंत्र्य मिळलेले आहे आणि त्यासाठी एकतेला बाधा येता कामा नये. देशाचे तुकडे झाले तर परकीय सत्ता यायला वेळ लागणार नाही. भारतीय शिक्षण आयोग 1964 - 66 यामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जर राष्ट्रीय एकात्मता बळकट करायची असेल तर शिक्षणाचे मुख्य ध्येय हेच असले पाहिजे.

सामाजिक व भावनिक बळकटी आणायची असेल लोकांमध्ये भावनिक एकात्मतेला तेवढेच महत्त्व आहे. एखाद्या समाजापेक्षा किंवा विचारसणीपेक्षा किंवा उत्पन्नापेक्षा भारत हा माझा देश आहे आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून एकमुखी आवाज आला पाहिजे.

आपल्याला असे वाटते का की सामाजिक, आर्थिक आणि सर्वाचा विकास होताना आम्ही सर्व एक आहोत? सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकांसाठी योजना राबविल्या पाहिजेत.

आज राष्ट्रीय एकात्मतेसमोर फार आव्हाने आहेत? तुम्हास असे वाटते का की आम्ही सर्व एक आहोत या धोरणाला बाधा आणणारे काही घटक आहेत? अनेक स्वतंत्र गट याबाबतीमध्ये कार्यरत आहेत. हे दिशाभूल करणारे अनेक गट आहेत. हा समाजाला लागलेला कॅन्सर आहे, हे त्यांना ओळखता आले पाहिजे. समाजवाद जातीयवाद, विभाजनवाद, प्रादेशिकवाद, आर्थिक विषमता, उत्पन्नातील तफावत, गरीब–श्रीमंत यामध्ये दरीतवाढ होत आहे. यामधून अनेकांच्या भिन्न भावना निर्माण होतात. त्याशिवायही आपण अन्य बाबींचा शोध घ्या.

राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी सामाजिक विज्ञान काय करू शकते. राष्ट्रीय एकात्मता आणि एकतेसाठी सामाजिक विज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकते. राष्ट्रीय एकता व राष्ट्रीय ओळख म्हणून निर्माण करण्याची जाणीव सामाजिक विज्ञानातून होऊ शकते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 नुसार भारताचा समृद्ध वारसा, भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास, राष्ट्रीय ओळख म्हणून भारतीय घटनेची बंधने पाळली पाहिजेत. देशाची माहिती होण्यासाठी भारताचा इतिहास आणि भूगोल समजला. पाहिजे. सामाजिक विज्ञानातून भारतीय एकात्मता ही आंतरराष्ट्रीय एकात्मतेशी संबंधित आहे. आपण जागतिकीकरणाच्या युगात राहतो. देश किंवा राष्ट्र हे एकुलते एक राहू शकत नाही. मानवाला भेडसावणाऱ्या अनेक समस्या देशापुरत्या मर्यादित न राहता त्या वैश्विक बनतात. त्याची खबरदारी ही जागतिक स्तरावरील लोकांनी घेतली पाहिजे.

तुम्हाला अशा समस्या माहित आहेत? पर्यावरणाचा संबंध हा व्यापार आणि आर्थिक विषयाशी संबंधित आहे. मानवी विकास लोकसंख्या समस्या जागतिक शांतता इत्यादी त्यापैकीच

विषय आहेत. आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या अभावामुळेच दोन जागतिक महायुद्धांना सामोरे जावे लागले त्यामुळे जैविक हानी, वित्त आणि मानवी मूल्यांची हानी झाली. लोकांमध्ये तसेच देशामध्ये सामंजस्य आणि सहकार्य आवश्यक आहे. मानवी हक्क, मानवी विकास हे महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक देशातील लोकांनी पुढे येणे महत्त्वाचे आहे. सामाजिक विज्ञान या विषयामध्ये विद्यार्थ्यांच्या सामाजिक दृष्टीने अनुकुल मत तयार करण्याची क्षमता आहे. इतिहास भूगोल शिकल्याने मानवाच्या दृष्टीने जग सुंदर बनविण्याच्या असणारी आव्हाने पेलण्याची क्षमता येईल, जगाचा भूगोल व इतिहास शिकून जग हेच कुटुंब आहे असा कौटुंबिक भावनांचा विकास होईल. आंतरराष्ट्रीय शांतता, सहकार्य, सामंजस्य, एकमेकांचा सन्मान, एकमेकांच्या भावना समजून घेण्यासाठी सध्याच्या जगाचा इतिहास अभ्यासक्रमातील पाठांची संख्या पुरेशी आहे. आंतरराष्ट्रीय संस्थाच्या माध्यमातून सहकार्य व आदर याबद्दल चांगली पार्श्वभूमी आहे. या संस्था काय काम करतात हे विद्यार्थ्यांना समजून सांगणे गरजेचे आहे. आंतरराष्ट्रीय स्थिती त्यांना समजू द्या. पर्यावरण लोकसंख्या, शिक्षण, आर्थिक व व्यापार स्थिती त्यांना समजू द्या. या सर्व समस्या सोडविण्यासाठी संस्था कार्यरत आहेत. राष्ट्रीय एकात्मता व आंतरराष्ट्रीय सामंजस्यांचा समावेश सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात केलेला आहे.

### 2.2.4 निधर्मवाद व समाजवाद

देशातील विविध धर्मांबद्दल आपण बोलतो तेव्हा आपण बहुधर्मियांबद्दल बोलतो. देशातील विविध रुढी, परंपरा एकत्र नांदत आहेत. देशातील अनेक धर्मांचा उदय भारतात झाला आणि त्याचा प्रसार हा जगभर झाला. अनेक परकीय धर्म आपल्याकडे आले आणि त्याचा स्वीकारही केला. सर्वांनी एकत्र रहायचे ही परंपरा देशामध्ये आहे. अनेक धर्मांचे सण उत्सव एकत्र साजरे केले जातात. परंतु विविध धर्मियामध्ये काही समस्या नाही असे आपण म्हणू शकत नाही. त्यासंदर्भात काही समस्यांचा उवापोह येथे करू.

**कृती 2**

आपल्या देशातील विविध धर्मांची यादी करा. विविध धर्मियांची आकडेवारी ही लोकसंख्या पुस्तिकेवरून मिळवा.

भारत हे निधर्मी राष्ट्र राहील असे घटनेमध्ये नमूद केलेले आहे. प्रत्येक धर्मयांबाबत समान स्वातंत्र्य असेल. भारतीय निधर्मीयता म्हणजे धर्महिनता नव्हे. मग देशात असे जातीय झगडे का चालतात? त्याचे खरे कारण काय? अन्यधर्मियांना कमी लेखल्यामुळे? देश विघातक शक्तीनी? काही गटांनी जातीय भावनांचे सुप्त धोरण ठरवून केले काय? जातीय भावना भडकविण्याचा प्रयत्न? दुसऱ्याच्या भावना विचारात न घेता? किंवा याला व्यक्तिगत व क्षूल्लक कारणे या मागे असतील का? याची उत्तरे देशातील नागरिक शोधतील. मुलासमोर असे प्रश्न चर्चेसाठी घ्यायचे असे तुम्हाला वाटते का?

**कृती 3**

1. राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी कोणते आर्थिक व सामाजिक कार्यक्रम उपयुक्त ठरतात?
2. भारताची एकता एकात्मता कमकुवत करण्यास कारणीभूत असणाऱ्या गोष्टी कोणत्या?
3. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावी यासाठी कोणते कार्यक्रम राबविता येतील? राष्ट्रीय दिनांचे आयोजन करण्याने शक्य होईल?
4. सामाजिक विज्ञान आशयातून राष्ट्रीय एकता व एकात्मता साध्य करता येईल अशा विषयांची यादी करा.
5. आंतरराष्ट्रीय संघटना व संस्थांची यादी करा. पुढील संस्थेच्या कार्याची माहिती जमा करा. UNO, UNESCO, UNICEF, WTO, ICJ, WHO, FAO.

Notes

6. विविध संस्थांच्या स्थापना दिनी शैक्षणिक वर्षात शाळेत काय करू शकाल याचा आराखडा तयार करा. उदा. जागतिक दिन; UNO, जागतिक पर्यावरणदिन
7. तुमच्या परिसरात जातीय दंगल झालेली आहे अशी कल्पना करा सामाजिक भावना म्हणून तुम्ही आणि तुमचे विद्यार्थी काय कराल याची कल्पना करा.

**तुमची प्रगती तपासा : 2**

1. सामाजिक विज्ञानातून घटनात्मक मूल्य विद्यार्थ्यांच्या मनावर कशाप्रकारे ठसविणार याची यादी तयार करा.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

2. लोकशाहीची तयारी म्हणून कोणत्या शिक्षण आयोगाने शिफारस केलेली आहे.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

3. कोणत्या राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याद्वारे गाभा घटकांची शिफारस केलेली आहे?

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

4. सामाजिक कल्याणासाठी कोणकोणत्या आंतरराष्ट्रीय संस्था कार्यरत आहेत?

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

## 2.2.5 सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमातील दुय्यम घटकांचा परिणाम

उशिरा का होईना परंतु मार्कस्वादी विचारसरणींबरोबर मध्यमवर्गीयांनी आपली भूमिका मांडली. हा non elite लोकांचा गट म्हणजेच ‘subaltern’ हाताखालचे लोक साधारणपणे 1980 च्या सुमारास हा संज्ञा वापरली गेली.

ही संज्ञा कनिष्ट गटासाठी, वंचितांसाठी किंवा, खालच्या दर्जासाठी वापरली जाते. श्रेष्ठत्व मानणाऱ्या व दुय्यम स्थान असणाऱ्यांसाठी ही संज्ञा पूर्वग्रहदुषित पद्धतीने इतिहासात मांडली गेली. या दुय्यम स्थान असणाऱ्या विचारवंतांनी इतिहास, अर्थशास्त्र व सामाजिक विज्ञान अभ्यासकांनी तीसरे जग समजले आहे. वर्चस्व असलेल्या गटाने इतिहासाबरोबरच स्वातंत्र्य चळवळीचे श्रेय घेतले. शेतकऱ्यांची चळवळ, संथल चळवळ 1855 मध्ये सुरू झाली, चंपारण्य सत्याग्रह 1917 - 18, बारडोलीचा सत्याग्रह 1928 यामध्ये सर्व सामान्यांना त्यांचे हक्क हवे होते. कारण त्यावेळी ब्रिटिश सरकारने शेतसारा नव्या पद्धतीने वसूल करायचे ठरविले होते. त्यामुळे या पद्धतीला विरोध करण्यासाठी सर्वसामान्य शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलने केली.

भारतामध्ये दुय्यम स्थानी असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे त्यांचे पडसाद सर्वसामान्यांकडून मोठ्या प्रमाणात पडतात. विकासावर त्याचा परिणाम होतो असे आपणास वाटते का? या सर्व सामान्यांचा विचार न करता सामाजिक व राष्ट्रीय प्रक्रीयेमध्ये लोकशाही यशस्वी होईल

Notes

का? अशांचे मत विचार घ्यावे असे वाटते का? त्यामुळे सर्वसामान्यांचे भविष्य हे वर्चस्व असणारा उच्चभ्रू गटच ठरवित असतो. त्यामुळे सर्व सामान्यांच्या विचारधारेतून यांचेकडे पाहिले पाहिजे. त्यांनीच स्वत:बद्दल बोलले पाहिजे. Subattern म्हणजे ज्यांचे आवाज सूप्त आहेत. त्यांच्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. या घटकाला जर आपण वगळले तर विद्यार्थ्यांच्या जाणिवा जागृतीला आपण कमी पडलो असे म्हणता येईल.

### 2.2.6 लिंग, जात आणि आदिवासींचे स्वरुप

सोबतच्या सारणीमध्ये भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेशाच्या साक्षरतेच्या प्रमाण दिलेले आहे.

**टेबल 2.1 भारतातील साक्षरता 2011**

| State | | All Persons | Male | Female |
|---|---|---|---|---|
| 1 | Andaman | 86.3% | 90.1% | 81.8% |
| 2 | Andhra Pradesh | 67.7% | 75.6% | 59.7% |
| 3 | Arunachal Pradesh | 76.0% | 73.7% | 59.6% |
| 4 | Assam | 73.2% | 78.8% | 67.3% |
| 5 | Bihar | 63.8% | 73.5% | 53.3% |
| 6 | Chandigarh | 86.4% | 90.5% | 81.4% |
| 7 | Chattisgarh | 71.0% | 81.5% | 60.6% |
| 8 | Dadra and Nagar Haveli | 77.7% | 86.5% | 65.9% |
| 9 | Daman and Diu | 87.1% | 91.5% | 79.6% |
| 10 | Delhi | 86.3% | 91.0% | 80.9% |
| 11 | Goa | 87.4% | 92.8% | 81.8% |
| 12 | Gujarat | 79.3% | 87.2% | 70.7% |
| 13 | Haryana | 76.6% | 85.4% | 66.8% |
| 14 | Himachal Pradesh | 83.8% | 90.8% | 76.6% |
| 15 | Jammu and Kashmir | 68.7% | 78.3% | 58.0% |
| 16 | Jharkhand | 67.6% | 78.5% | 56.2% |
| 17 | Karnataka | 75.6% | 82.8% | 68.1% |
| 18 | Kerala | 93.9% | 96.0% | 92.0% |
| 19 | Lakshadweep | 92.3% | 96.1% | 88.2% |
| 20 | Madhya Pradesh | 70.6% | 80.5% | 60.0% |
| 21 | Maharashtra | 82.9% | 89.8% | 75.5% |
| 22 | Maghalaya | 79.8% | 86.5% | 73.2% |
| 23 | Meghalaya | 75.5% | 77.2% | 73.8% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 24 | Mizoram | 91.6% | 93.7% | 89.4% |
| 25 | Nagaland | 80.1% | 83.3% | 76.7% |
| 26 | Orissa | 73.5% | 82.4% | 64.4% |
| 27 | Puducherry | 86.5% | 92.1% | 81.2% |
| 28 | Punjab | 76.7% | 81.5% | 71.3% |
| 29 | Rajasthan | 67.1% | 80.5% | 52.7% |
| 30 | Sikkim | 82.2% | 87.3% | 76.4% |
| 31 | Tamil Nadu | 80.3% | 86.8% | 73.9% |
| 32 | Tripura | 87.8% | 92.2% | 83.1% |
| 33 | Uttar Pradesh | 69.7% | 79.2% | 59.3% |
| 34 | Uttarakhand | 79.6% | 88.3% | 70.7% |
| 35 | West Bengal | 77.1% | 82.7% | 71.2% |
| | **INDIA** | 74.04% | 82.14% | 65.46% |

जर आपण वरील सारणीकडे पाहिले तर स्त्री – पुरुषांच्या साक्षरतेमध्ये विविध राज्यांमध्ये खूप फरक आहे.

भारतीय लोकसंख्येमध्ये निम्मी लोकसंख्या स्त्रीयांची आहे. भारतीय स्त्रीची माता म्हणून पूजा केली जाते तसे देशभर मात्र पुरुषांप्रमाणे वागवणूक नाही. जनगणनेची आकडेवारी पाहता सर्वसाधारण गटातील असो किंवा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीतील स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी आहे. स्त्री जन्मप्रमाणही पुरुष जन्म प्रमाणापेक्षा कमी आहे. राजकीय क्षेत्रामध्ये स्त्रियंचे प्रमाण खूप कमी आहे. निवडून आलेल्या स्त्रीयांचे प्रमाणही पुरुषांपेक्षा नगण्य आहे. स्थावर मिळकतीवर पुरुषांचीच नावे असतात. देशात सर्वसाधारणपणे स्त्रीयांना कमी प्रमाणात मान दिला जातो. देशातील नागरी संस्थाही स्त्रीयांसाठी सुरक्षित नाहीत. त्यांची सुरक्षितता आणि कल्याण अगदी त्यांच्या घरातही नाही. स्त्री अत्याचार विषयाबाबत देशात गंभीरपणे विचार केला जात आहे. वरील चित्र जर पाहिले तर आपण समान वागणूक, महिला सन्मान, महिला सबलीकरण, स्वातंत्र्य हे केवळ एवढ्यावरच चालणार नाही. जेव्हा सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा मदत करणे. गरजेचे आहे. भारतात मुलांचा गौरव केला जातो. किंबहूना स्त्रीया याच स्त्रीयांच्या स्थितीला कारणीभूत आहेत.

**दर हजार पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण (2011)**

| भारत | बिहार | छत्तीसगड | झारखंड | ओरिसा | पंजाब | युपी | तुमचे राज्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 940 | 916 | 991 | 947 | 978 | 893 | 908 | शोध घ्या |

जगातील प्रगतराष्ट्र म्हणून आधुनिक मुक्त लोकशाहीच्या भारतासारख्या देशाची परिस्थितीही कौतुक करण्यासारखी नाही.

भारतीयांच्या मानसिकतेमध्ये बदल होणे आवश्यक आहे कायदा किंवा बळजबदरी ही सामाजिक बदलास पुरेशी नाही. शिक्षक म्हणून सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मुलांची वृत्ती बदलू शकता. सामाजिक विज्ञान हा भविष्यातील नागरिकांना बदल घडवून आणणारा एक संवेदनशील विषय आहे. उदा. स्त्री पुरुष समानता अभ्यासक्रमात समावेश झालेला आहे.

Notes

भारताच्या इतिहासातील काही महिलांचा सहभाग ही केवळ चर्चा करून चालणार नाही. स्त्री हा समाजाचा अविभाज्य घटक म्हणून त्याचे सामाजिक स्वास्थ, सामाजिक विकास, आर्थिक विकास त्यांचा मालमत्तेतील हक्क, समानता, दर्जा आणि सन्मान दिला पाहिजे. मुलींच्या शिक्षणाबाबतचा प्रश्न स्त्री साक्षरतेची वाढ स्वातंत्र्यानंतर वेगाने झाली. शिक्षणामध्येही स्त्रीयांना समान संधी प्राप्त झाली पाहिजे.

भारतीय मागासवर्गीय जाती या वंचित असून सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक बाबतीत त्यांना मागे ठेवलेले आहे. जातीय रचनेप्रमाणे खालच्या स्तरानुसार गरीबी पिळवणूक व शोषण चालू आहे. भारतीय समाजाचे पिढ्यानपिढ्या तेच चित्र आहे. या मागास जातीच्या लोकांना पुढे येण्याची संधी देवून त्याची क्षमता वाढविली पाहिजे. नेतृत्त्व व राजकीय क्षेत्रांमध्ये त्यांचा सहभाग वाढविला पाहिजे. मागासवर्गीयांच्या भावना आत्मसन्मान त्यांची स्वप्न आणि मानाची जीवनशैली मिळाली पाहिजे. अगदी तळागाळापासून प्रगती झाली तरच ही प्रक्रीयाही परिवर्तशील होईल. शिक्षण हे मनाची जागृती करणारे साधन आहे. हजारो वर्षे जी पद्धती चालू आहे. त्यात बदल होईल, मुख्य भर जो आहे. तो म्हणजे अनुसूचित जातीचे आणि अनुसूचित जातीत नसणारे यांच्यामध्ये सर्व क्षेत्रामध्ये समानता आली पाहिजे. ग्रामीण स्त्री–पुरुष, नागरी स्त्री–पुरुष यामध्ये सर्व क्षेत्रात समानता यायला हवी. (NPE 1986)

**टेबल 2.3 अनुसूचित जाती व जमाती यांची काही राज्याची साक्षरता**

| **राज्य** | **अनुसूचित जाती** | | **अनुसूचित जमाती ST** | |
|---|---|---|---|---|
| | **सरासरी** | **स्त्री साक्षरता** | **सरासरी** | **स्त्री साक्षरता** |
| बिहार | 28.5 | 15.6 | 28.2 | 15.5 |
| छत्तीसगड | 64.0 | 49.2 | 52.1 | 39.3 |
| झारखंड | 37.6 | 22.5 | 40.7 | 27.2 |
| ओरिसा | 55.5 | 40.3 | 37.4 | 23.4 |
| उत्तरप्रदेश | 46.3 | 30.5 | 35.1 | 20.7 |
| **भारत** | **54.69** | | **47.10** | |

**जनगणना 2001**

शिक्षण हे सामाजिक बदलाचे शक्तिमान साधन आहे. मागासवर्गीय जातीतील मुलांच्या शिक्षणासाठी – वय, सामाजिक व आर्थिक अडसर दूर झाला पाहिजे. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले पाहिजे. शिक्षणामुळे मानसिक जागृती झाली पाहिजे. शिक्षणामुळे दुय्यम दर्जाचा व मानसिक भेद नष्ट झाला पाहिजे. अभ्यासक्रम असा असवा की त्यामध्ये संस्कृती भाषा आणि त्या लोकांच्या ज्ञानाची सवेदना असली पाहिजे. मागासवर्गीय विद्यार्थ्याला शाळा परिसर व संस्कृतीचे ज्ञान झाले पाहिजे त्याच्याशी न्यूनगंड दूर होवून आपण काय आहोत हे विसरून नव्या आलेल्या गोष्टींचा स्वीकार करावा लागेल.

अनुसूचित जमातीची लोकसंख्या देशाच्या लोकसंख्येमध्ये साधारण आहे. हे लोक स्वतंत्र वास्तव करतात. त्यांची स्वतंत्र भाषा असून स्वतंत्र संस्कृती आहे. अनेक जमातीची भाषा फक्त बोली भाषा आहे. त्याच्या रुढी परंपरा व चालीरितीही स्वतंत्र आहेत. ज्ञानाच्या चौकटीही ठरलेल्या आहेत. निसर्गाच्या सानिध्यात रहात असल्याने त्यांना निसर्गानेच वैशिष्ट्यपूर्ण बनविले आहे. त्यामुळे पर्यावरणाशी सुसंवाद साधलेला आहे. त्यांना त्यांच्या जीवन पद्धतीचा अभिमान आहे. त्यांची भूमी आणि संस्कृती वाचविण्यासाठी ब्रिटिशांबरोबर शौर्यपणे लढा दिला. सन 1855 संथळांचा उठाव त्यापैकीच आहे. बिरसा मुंडा या नेत्याचे उदाहरण देता येईल.

अनुसूचित जमातीचे लोक दुर्गम भागात राहतात. मुख्यता प्रगत समाज किंवा औद्योगिक राजकीय क्षेत्रांपासून दूर आहेत. त्यामुळेच ते अनेक गोष्टींपासून वंचित आहेत. त्यांच्या भाषेमुळे मुलांच्या शिक्षणास अडसर असून त्यांच्या मुलांना पुस्तकी भाषा परकी भाषा वाटते. त्यांच्याच भाषेतून जर साहित्य उपलब्ध केले तर त्यांच्यामधील अडथळा दूर होईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 नुसार अभ्यासक्रमाची रचना करताना समृद्ध संस्कृतीची ओळख व्हावी आणि त्यांच्यातील सर्जनशीलतेला वाव मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. सामाजिक विज्ञान या विषयातून इतिहास, संस्कृती व पर्यावरण आणि विकास या अभ्यासातून त्या लोकांचे जीवन माहित होईल.

**कृती 4**

1) भारतीय जनगणनेच्या आकडेवारीवरून भारतातील व तुमच्या राज्यातील दर हजारी पुरुषांमागे असलेल्या स्त्रीयांचे प्रमाण काढा.
2) अनुसूचित जाती – जमाती आणि सर्वसाधारण साक्षरतेची तुलना करा. साक्षरतेचे अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि सर्वसाधारण साक्षरतेची तुलना करा. त्यातून तुम्हास काय लक्षात येते? कोणता गट हा शिक्षणापासून मागे आहे? सर्व गटामध्ये शैक्षणिक दृष्ट्या सर्वात मागे असणारा गट कोणता?
3) भारतामध्ये अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीच्या लोकांची संख्या अधिक असणारी राज्ये कोणती? त्या – त्या राज्यातील आर्थिक स्थिती आणि विकास याची अन्य राज्यांशी तुलना करा. या तुमच्या वाचनातून काय निष्कर्ष नोंदवाल? सदर बाबतीत तुम्ही विद्यार्थी आणि शिक्षक सहकाऱ्यांशी चर्चा करून अनुमान काढा.
4) तुमच्या माहितीनुसार सर्वात मोठा परिणामकारक गट कोणता?

**तुमची प्रगती तपासा : 3**

1. दुय्यम स्थान असणारे लोक कोण आहेत?

2. दुय्यम स्थानी असणाऱ्यांच्या इतिहासातील चळवळींची नावे लिहा.

3. साक्षरतेचा विचार करता कोणता गट हा मागे राहिलेला आहे.?

## 2.2.7 सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील चित्र

सध्या आपण वैश्विक युगात जगत आहोत. लोक आणि देश हे सध्या परस्परांवर अवलंबून आहेत. वाहतूक संदेश वहनाच्या प्रगतीमुळे लोक, प्रदेश आणि जग जवळ आलेले आहे. लोकांना आणि समाजाला जागतिक आव्हाने आहेत. पर्यावरणाचा संबंध तर जगभरच्या लोकांशी आहे. पर्यावरणाचे रक्षण, प्रदुषण नियंत्रण आणि पर्यावरणाच्या संपदेचा कायदेशीर वापर केला पाहिजे.

Notes

मानवजातीला अनेक प्रश्न निर्माण करणारे आहेत, व्यापार, आंतरराष्ट्रीय शांतता, वैमनस्य, युद्ध साहित्याची स्पर्धा, दहशतवाद, त्सुनामी सारख्या आपत्ती इत्यादी समस्यांची जाणिव, जागतिक प्रश्नांची जाणिव ही सामाजिक विज्ञानावर जबाबदारी येते.

आधुनिक जगात मानवी विकास, मानवी जीवनाचा दर्जा, मानवी हक्क यांचा जगाशी संबंध येत आहे. जगाच्या एखाद्या भागात झालेला विकास अन्य भागावरही परिणाम करतो. जगाच्या एकाद्या भागातील लोकांचा संबंध जगाच्या दुसऱ्या भागातील लोकांशी येतो. याबरोबरच समान स्वातंत्र्य, न्याय किंवा वंश हा कोणत्याही एका समाजाचा हिस्सा राहिलेला नाही. ही समाजाच्या बहुसंख्य लोकांना माहीत आहे. हे सर्व प्रश्न सामाजिक विज्ञान विषयात जगातील अभ्यासक्रमामध्ये दिसून येतात.

जगातील विविध भागामध्ये सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाची स्थिती पाहू. दक्षिण आफ्रिकेतील अभ्यासक्रमात उदाहरण म्हणून जागतिक प्रश्न घेतलेले आहेत.

दक्षिण आफ्रिकेच्या बदलेल्या अभ्यासक्रमात आठ मुख्य अभ्यासक्रमातील आठ मुख्य भाग आहेत. ती मुले मानव आणि  पर्यावरणावर सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि पर्यावरणाच्या विषयात लोकांची वृत्ती मुल्ये आणि निष्ठा यासंबंधी अभ्यास करतात. अभ्यासक्रमात संकल्पना कौशल्य, इतिहासाची प्रक्रीया, भूगोल, पर्यावरणशास्त्र विषय आहेत. सामाजिक विज्ञानामध्ये विद्यार्थी काय शिकतो? कसा शिकतो? आणि ज्ञानाची निर्मिती कशी होते? याच्याशी संबंध आहे का? मुलांनी प्रश्न विचारावेत त्यासाठी प्रेरणा दिली जाते. त्याची उत्तरे समाजातून व पर्यावरणातून मिळवावयाची. समाजाचे बदलते स्वरुप हे शिकणाऱ्या विषयातून शोधायचे आहे. प्रगत समाजातील जबाबदार नागरिक समाजाचे स्वरूप बदलतील. अभ्यासक्रमाचा उद्देशच असा आहे. की विद्यार्थ्यांमध्ये अशी जाणीव व्हावी की देशाच्या भविष्यातील येणाऱ्या आर्थिक व सामाजिक विषमता दूर होतील.

सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात प्रश्न विचारण्याचे कौशल्य निर्माण व्हावे त्यातून प्राचीन अर्वाचिन इतिहास, भौगोलिक घटना –मानव व पर्यावरण यांचा सहसंबंध, ऐतिहासिक घटनांचे विश्लेषणाचे कौशल्य, स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक स्तरावरील घटनांचे सूक्ष्म अनुमान देशाची घटना, मानवी हक्क आणि पर्यावरणाचे प्रश्न याच्याशी संबंधित अभ्यासक्रम असावा.

अभ्यासाक्रमातून विद्यार्थ्याला अनेक प्रश्न निर्माण व्हावेत, जात, लिंग, वर्ग परकीयांची भिती, त्याबाबत पूर्वीची व सध्य स्थिती याबाबत प्रश्न निर्माण व्हावेत सत्तेच्या संबंधाचा विचार केला जावा. संपदा, राजकीय स्थिती, लिंग भेद, लोकांचे वास्तव्य इ. चा दैनंदिन जीवनावर कसा परिणाम होतो. यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव झाली पाहिजे. समाज नीती, आर्थिक आणि नैतिकता याबाबत दक्षिण आफ्रिकेत निर्माण होणारे प्रश्न जगातील अनेक नागरिकांना भेडसावत आहेत.

## 2.2.8 राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाची सध्याची विचारधारणा

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF 2005) यामध्ये सामाजिक विज्ञान विषयामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. या विषयामध्ये इतिहास भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, माववंशशास्त्र इत्यादी विषयांचा समावेश केलेला आहे. सभोवतालच्या समाजाकडे बारकाईने निरीक्षण करून प्रश्न निर्माण व्हावेत. समाज व संस्कृती यांचे निरीक्षण करून प्रश्न निर्माण व्हावेत. समाज व संस्कृती यांचे निरिक्षण कौशल्य वापरून जग परस्परांशी कसे एकमेकांवर अवलंबून आहे त्याचा राजकीय व आर्थिक स्थितीचा कसा संबंध आहे. हे (NCF 2005) मधून मानवी मूल्यांना महत्त्व दिले आहे.

सामाजिक विज्ञान हा विषय सध्या विकासाच्या वाटेने जात आहे. हे सत्य असले तरी समता, न्याय व प्रतिष्ठा या सारख्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. विकासासाठी प्रत्येकाचा सहभाग असला पाहिजे. (NCF 2005).

Notes

शिफारशीनुसार नागरिकशास्त्राला राज्यशास्त्र नाव दिले. नागरिक शास्त्र हे नाव ब्रिटिश कालीन शिक्षण पद्धतीत होते. आज्ञापालन हा नागरिकशास्त्राचा उद्देश होता. राज्यशास्त्रात मात्र जाणिव, सुसंवाद, स्वेच्छा आणि नागरिकातील परिवर्तन असा आशय आहे. (NCF 2005)

सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीय स्वरूप व स्थानिक स्वरूप यातून जागतिक संदर्भात भारताच्या इतिहासाचा अभ्यास आहे. यामधून स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक स्थिती या गोष्टींचा विचार केला जाईल. या अभ्यासक्रमातून सध्याचे प्रश्न भारतीय समाजाच्या समस्या – मानवी हक्क, सर्वसमावेशकता, पर्यावरण प्रदुषण, विविधता, बदल, लिंग, वर्ग, जातिय समानता इत्यादी समस्या समजून घेता येतील बाल आरोग्य, समाजाच्या गरजातील बदल, तरुणांचे पालकाबरोबर बदललेले संबंध, समान वयोगटातील मित्र, विरुद्ध लिंगी आणि युवक इत्यादी संबंधिची माहिती घेणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमातून जागतिक स्पर्धेची आव्हाने स्विकारली जावीत.

उच्च प्राथमिकच्या इतिहासाच्या अभ्यासक्रमातून भारतात झालेल्या विकासाची तुलना जगातील इतर भागाशी केली जावी. भूगोलामधील पर्यावरणाशी संबंधित प्रश्न, संसाधने, विविध पातळीवरील विकास हा स्थानिक पातळीवरून जागतिक स्थितीशी तुलना व्हावी. राज्यशास्त्रामध्ये स्थानिक पातळीवरून जागतिक स्थितीशी तुलना व्हावी. राज्यशास्त्रामध्ये स्थानिक सरकार, राज्य व देशाचे सरकार, लोकशाही प्रक्रियेतील जनतेचा सहभाग अभ्यासला जावा. अर्थशास्त्रात आर्थिक संस्था, कुटुंब, बाजारपेठ व राज्य अभ्यासायला हवे. त्या विविध विषयांचा अभ्यास बहुउद्देशिय व आंतरशाखीय स्वरुपाचा असावा. (NCE 2005)

सदरच्या अभ्यासक्रमाचा उद्देश हा माहितीपर अभ्यासक्रमातून विचारार्थ स्वरूपात बदल व्हावा. अध्यापन व अध्ययन असे असावे की ज्यामधून पर्यावरणांकडे ज्ञान व कौशल्याच्या सहाय्याने पाहता यावे. सामाजिक विज्ञानातून सर्जनशीलता, सौंदर्यदृष्टी व सामजिक बदलाकडे बारकाईने पाहण्याची मुलांची वृत्ती विकसित व्हावी. समस्या निराकरण, नाट्य आणि नक्कल या पद्धती राबवाव्यात. अध्यापनात दृक–श्राव्य साधने, चित्रे, फोटो, चार्ट, नकाशे, पुराण वस्तू साधने वापरवित अध्यापनात केवळ माहिती ऐवजी चर्चा घडवून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवावा. त्यातून समाजातील विद्यार्थी व शिक्षकाची जागृती समजेल. शिक्षकाची खुली अध्यापन पद्धती असावी. विविधांगी समाजाचे चित्र उभे करून विद्यार्थ्याला स्वयंसिद्ध करावे.

**कृती 5**

1) भारतात व दक्षिण आफ्रिकेच्या सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात असलेली समानता कोणती?
2) सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये भारतात कोणते प्रश्न मांडले जावेत असे तुम्हाला वाटते?
3) भारतीय अभ्यासक्रमातील सामाजितक विज्ञान अध्यापन अध्ययनात कोणती नवीन तंत्र वापरली जावीत.

**तुमची प्रगती तपासा : 4**

1) जगातील अनेक देशांच्या सर्वसाधारण समस्यांची यादी करा.

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

2) दक्षिण आफ्रिकेतील सामाजिक विज्ञान विषयातील अभ्यास विषय कोणते?

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

Notes

3) NCF 2005 ने नागरिकशास्त्र विषयाला कोणते नाव सूचविले आहे?
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------

4) NCF 2005 च्या सध्याच्या क्रमिक पुस्तकातील अभ्यासक्रम बदलाचा उद्देश आहे. या बदलाच्या कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत?
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------

## 2.3 सारांश

गेल्या काही वर्षामध्ये अनेक प्रगतीचा परिणाम सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावर झालेला आहे. ब्रिटिश राजवटीमुळे सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाचा प्रारंभ झाला आणि याच काळात अनेक क्षेत्रात बदल झाला. तसेच भारताच्या इतिहास लेखनात बदल झाला. सर्व्हे ऑफ इंडिया, भारताची जनगणना, इंग्रजी धर्तीचे शिक्षण इत्यादी बदल झाले. युरोपियनांची मक्तेदारी यामुळे भारताच्या इतिहासामध्ये नकारात्मक वर्णन झाले. पर्यायी राष्ट्रवादी भावनेने अभ्यासक्रम सामाजिक विज्ञानामध्ये तयार करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेमध्ये त्याचे पडसाद पडले. समाजवाद, निधर्मवाद, स्वातंत्र्य समता, न्याय आणि बंधुत्व याचा समावेश नव्या सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये झाला. नव्या अभ्यासक्रमात विविधता, राष्ट्रीयएकात्मता, आंतराष्ट्रीय सामंजस्य, पर्यावरण, विकास इत्यादी विषयांचा समावेश झाला. दुय्यमस्थान, लिंग, जात, जमाती यामुळे भारतीय समाजाचे लक्ष वेधले. या प्रश्नांचाही परिणाम सामाजिक अभ्यासक्रमावर झाला. जगात अन्यत्र काम चालू झाले. दक्षिण आफ्रिकेतील अभ्यासक्रमाकडे आपले लक्ष वेधले. दोन्ही देशातील सामाजिक स्तर सारखाच आहे. त्यामुळे अभ्यासक्रमातही साम्यता आणण्याचा प्रयत्न झाला. सध्याच्या भारतीय सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीय व सामाजिक प्रश्न मांडून अध्ययन अध्यापनामध्ये समाजाचे ज्ञान व आकलनासाठी नवीन दृष्टी यावर अधिक लक्ष दिलेले आहे. विद्यार्थ्यांनी स्वत:च्या ज्ञानाने भारतीय समाज समजून घेतला पाहिजे.

## 2.4 तुमची प्रगती तपासा

**तुमची प्रगती तपासा 1**

1) जेम्स मील
2) जेम्स प्रिसेस
3) शोध व देशाचा नकाशा
4) बडोद्याचे सयाजीराव गायकवाड

**तुमची प्रगती तपासा 2**

1) लोकशाही, निधर्मवाद, समाजवाद, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व
2) माध्यमिक शिक्षण आयोग 1948 - 49
3) राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986
4) UNO, UNESCO, UNICEF इत्यादी

Notes

**तुमची प्रगती तपासा 3**

1) दुय्यम स्थानाचे, दारिद्र्य रेषेतील वंचित लोक
2) 1855 चा संथल उठाव, चंपारण्य सत्याग्रह (1917-18) बारडोली सत्याग्रह (1928)
3) आदिवासी स्त्रिया

**तुमची प्रगती तपासा 4**

1) पर्यावरण, व्यापार, मानवी हक्क, समता
2) सामाजिक विज्ञानामध्ये मानसामानसातील तसेच पर्यावरणशास्त्रासंबंध हा विषय सामाजिक विज्ञानामध्ये अभ्यासला जातो. या विषयावर सामाजिक, राजकीय, आर्थिक व पर्यावरण यांचा परिणाम लोकांवर होतो. लोकांची वृत्ती, मूल्ये व श्रद्धा त्यावर अवलंबून असतात.
3) राज्यशास्त्र
4) माहितीपर अभ्यासक्रमातून विचारप्रवर्तक अभ्यासक्रम व्हावा.

## 2.5 संदर्भ साहित्य


- Department of Education, Pretoria, South Africa (2002), Revised National Curriculum Statement Grades R - 9 (Schools,) Social Sciences.
- His eastern and western Disciples (2000). Life of Swami Vivekananda, 2 vols. (Calcutta. Advaita Ashrama.)
- National Policy on Education, 1986.
- NCERT (2005). National Curriculum Framework 2005. New Delhi. NCERT.
- Seneviratna, Anuradha. (1994). King Asoka and Buddhism. Kandy, Sri Lanka :Buddhist Publication Society.
- Census of India, 2011
- http://asi.nic.in/asi_aboutus_history.asp
- http://www.nlm.nic.in/literacy01_nlm.htm
- http://www.censusindia.gov.in
- Thomas Babington Macaulay, “Minute on Education,” in Throgh Indian Eyes: The Living Tradition, Donald J.Johnosn, et al. (New Yourk : CITE Books 1992).


## 2.6 पाठावरील प्रश्न

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

प्र. 1. ब्रिटिश कालीन भारतात सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमावर कसा परिणाम झाला ही चर्चा करा.

प्र. 2. सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात घटनेची मूल्ये आणि आदर्श यांचा समावेश कसा झाला?

प्र. 3. दुय्यम स्थानाचे लोक हेच समाजाचे खरे चित्र कसे?

प्र. 4. भारतीय स्त्रियांची स्थिती कशी आहे? स्त्री-पुरुष प्रश्न सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये कशाप्रकारे मांडले पाहिजेत?

प्र. 5. अनुसूचित जमातीच्या समाजात परिवर्तन कसे करता येईल असे तुम्हास वाटते? त्याचवेळी त्यांची संस्कृतीही टिकली पाहिजे या बाबत तुम्हाला काय वाटते?

प्र. 6. राष्ट्रीय एकात्मता आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य यांचा सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमातील संबंध कोणता?

Notes

प्र. 7. दक्षिण आफ्रिकेतील सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये मूल्ये आणि प्रश्नांचा काय महत्त्व दिलेले आहे? त्याचा परिणाम भारतावर झाला का?

प्र. 8. सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाची भारतीय विद्यार्थ्यांवर कशी प्रकारे मूल्ये रुजविली जात आहेत?

प्र. 9. भारतात सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमाचे अध्यापन अध्ययनाचे नवे तंत्र स्पष्ट करा.